जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटीत तळपत्या उन्हात शेतात खाट टाकून 'आमरण उपोषण' सुरु

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली जरांगे यांची भेट, सावलीत बसून उपोषण करण्याची केली विनंती

जालना - मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आज, ३० मे रोजी तळपत्या उन्हात शेतात खाट टाकून आमरण उपोषण सुरु केले आहे. सातारा संस्थानच्या धर्तीवर शासन निर्णय काढणे आणि कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करावे, यासह विविध मागण्यांसाठी जरांगे यांनी हे उपोषण सुरु केले आहे. या पार्श्वभूमीवर, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपोषणस्थळी जावून जरांगे यांची भेट घेतली. तसेच ५ वाजता समिती आपल्या भेटील येईल, तोपर्यंत आपण सावलीत बसून उपोषण करावे, अशी विनंती केली. मात्र, जरांगे हे उन्हातच उपोषण करण्यावर ठाम राहिले.

उपोषण सुरू करण्यापूर्वी बोलताना मनोज जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारवर टीका केली. ते म्हणाले, मराठा समाज मोठा होऊ नये, असा विचार असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. कितीही चांगला जीआर काढला तरी त्याला न्यायालयात आव्हान दिले जाते. आता केवळ आश्वासने नकोत, तर कृती हवी.

जरांगे यांनी १० प्रमुख मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहेत. यात सातारा, कोल्हापूर, औंध, पुणे आणि मिरज संस्थांच्या धर्तीवर जीआर काढणे, कुणबी प्रमाणपत्र धारकांना त्वरित व्हॅलिडिटी देणे, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, आंदोलनात बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबीयांना नोकरी व भरपाई देणे आणि स्वतंत्र मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करणे यांसह विविध मागण्यांचा समावेश आहे. तसेच, त्यांनी लाठीचार्ज किंवा दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब करू नका, असा इशाराही सरकारला दिला.

जरांगे यांचे उपोषण सुरु होताच मंत्री विखे पाटील उपोषण



मराठा आरक्षणासाठी उन्हात बसून उपोषण सुरु केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपोषणस्थळी भेट घेतली.

स्थळी दाखल झाले. मराठा आरक्षणासाठी नेमलेली अभ्यास समिती ५ वाजता आंतरवाली सराटी येथे येत आहे. समिती त्यांचे निष्कर्ष आणि उपाययोजना आपल्यासमोर ठेवेल. आपल्या मागण्यांबाबत सरकारने काय केले आणि काय करणार आहे, हेही आपल्यासमोर स्पष्ट केले जाईल. पण तोपर्यंत आपण उन्हात न बसता सावलीत बसून उपोषण करावे, अशी विनंती विखे पाटील यांनी जरांगे यांना केली. त्यावर जरांगे यांनी उन्हातच उपोषण करण्याचा निर्धार व्यक्त करीत जर मला काही झाले तर उपचाराचा खर्च तुम्ही करा, अशी मिश्कील विनंत मंत्री विखे पाटील यांना केली. त्यावर मंत्री विखे पाटील यांनीही स्मित हास्य करीत आपण अगोदर सावलीत बसा, तुमच्या मागण्यांवर सरकार सकारात्मक आहे, असे सांगितले.

मनोज जरांगे यांच्या उपोषणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची बाजू मांडली. ते म्हणाले, सरकार मराठा आरक्षणाबाबत पूर्णपणे सकारात्मक आहे. आम्ही समाजा-समाजात तेढ निर्माण करून भांडण लावणारे नाही, तर समाजाच्या हिताचे निर्णय घेणारे आहोत. मात्र, आम्ही जे काही निर्णय घेऊ ते संविधान, कायदा आणि न्यायालयाच्या चौकटीत राहूनच घेतले जातील. एका समाजाचा हक्क काढून दुसऱ्याला देण्याचे काम आम्ही कधीही करणार नाही. मराठा समाजाचे समाधान करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करू, पण ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

### मनोज जरांगे यांच्या १० मागण्या काय?

१) मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे.

२) सातारा, कोल्हापूर, औंध आणि पुणे, मिरज संस्थांचा जीआर काढावा. १९९४ च्या धर्तीवरच जीआर काढा.

३) महाराष्ट्रातील मराठा आरक्षण आंदोलनातील सर्व सरसकट गुन्हे मागे घ्यावे.

४) आंदोलनात बलिदान देणाऱ्या कुटुंबीयांना महावितरण आणि एसटीमध्ये नोकरीचा जीआर काढा.

५) सारथीच्या सर्व योजना पुन्हा सुरू करा.

६) महामंडळाचे सर्व परतावे ताबडतोब वाटप केले पाहिजे.

७) कुणबी प्रमाणपत्र आणि त्याची व्हॉलिडिटी द्यावी.

८) मराठा उपसमिती काही कामाची नाही, अध्यक्षाला काम नाही. उपसमिती बरखास्त करा.

९) स्वतंत्र कुणबी आणि मराठा मंत्रालय स्थापन करा.

१०) शिंदे समितीला मुदतवाढ देऊन रेकॉर्ड तपासायला लावा.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा अखेर भाजपमध्ये प्रवेश

मुंबई - राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार पक्ष) काँग्रेसचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अखेर पक्षाला सोडचिठ्ठी दिली असून, ३० मे रोजी दुपारी ३ वाजता तनपुरे यांनी मुंबई येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप कार्यालयाजवळ त्यांचे स्वागत करणारे बॅनर्सही लावण्यात आले होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांचीही उपस्थिती होती.

पक्ष प्रवेश झाल्यानंतर बोलताना तनपुरे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मी आभार मानतो. भाजपमध्ये आल्यानंतर मतदारसंघातील विकासकामे मार्गी लागतील, असा मला विश्वास आहे. मतदारसंघातील विकासकामे आणि कार्यकर्त्यांचा आग्रह लक्षात घेऊन आपण भाजपमध्ये आलो आहे. पक्ष जी जबाबदारी देईल, ती मी प्रामाणिकपणे पार पाडेल, असे ते म्हणाले. यावेळी त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्त्यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. मात्र, यावेळी तनपुरे यांच्या उमेदवारीबाबत कोणतेही भाष्य करण्यात आले नाही. दरम्यान तनपुरे सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करतील, असे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले.




प्राजक्त तनपुरे यांनी मुंबई येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

### राष्ट्रवादी सोडण्यास कारण की...

दरम्यान पक्ष प्रवेशापूर्वी तनपुरे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, मी नेहमीच संघर्ष करत आलोय. मधले अडीच वर्ष सोडले तर कधीही सत्तेत नव्हतो. आता कार्यकर्ते देखील या संघर्षाला कंटाळले आहेत. त्यांनाही त्यांचे राजकारण करायचे आहे. विकासाची कामे करायची आहेत. सत्तेत असलो की कामे होतात. विकास होतो. असे संघर्षात किती दिवस होरपळत बसायचे, अशी असंख्य कारकर्त्यांची इच्छा होती. त्यामुळे मी अखेरीस राष्ट्रवादी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला, अशा शब्दात माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### मामांना भेटण्याची हिंमत नाही

शरद पवार आणि जयंत पाटील यांच्याबद्दल आदर व्यक्त करत असताना ते म्हणाले, शरद पवार आणि मामा जयंत पाटील यांना भेटायचे होते. पण आता तेव्हढी हिंमत नाही, असेही त्यांनी कबूल केले. पक्ष सोडण्यापूर्वी आपण खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेतल्याचेही ते म्हणाले.

### सुप्रिया सुळेंशी १० मिनिटे चर्चा

२९ मे रोजी मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे प्राजक्त तनपुरे आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यात सुमारे १० मिनिटे चर्चा झाली. या भेटीदरम्यान, तनपुरे यांनी त्यांना आपण भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचे सांगितले. तसेच पक्षाने दिलेल्या संधीबद्दल त्यांनी सुळे यांचे आभार मानले.

# जे चमकतं ते नेहमी टिकतंच असं नाही



राजन कुटे

कृत्रिम दागिने सुरुवातीला खूप आकर्षक दिसतात. चमकदारपणा असतो, लोकांचं लक्ष वेधलं जातं, काही काळ खरे सुद्धा वाटतात. पण काळ जसजसा पुढे जातो, तशी त्यांची चमक कमी होऊ लागते.

गुंतवणुकीतही काही वेळा असंच घडतं. काही फंड, सेक्टर किंवा थीम अचानक चर्चेत येतात. अलीकडच्या परताव्यामुळे त्यांच्याकडे सगळ्यांचं लक्ष जातं. मग अनेकांना वाटू लागतं की आता संपत्ती निर्माण करायची असेल तर हाच एक मार्ग आहे. समस्या चांगली कामगिरी पाहण्यात नसते. समस्या ती कायम अशीच राहील असं गृहीत धरण्यात असते.

प्रत्येक बाजारचक्रात काही काळ विशिष्ट प्रकारची गुंतवणूक खूप वेगाने वाढताना दिसते. अशा वेळी संतुलित पोर्टफोलिओ संथ वाटू लागतो आणि जास्त वेगाने वाढणाऱ्या पर्यायांकडे आकर्षण वाढतं. पण बाजार कायम एका दिशेने चालत नाही. नेतृत्व बदलत राहतं, चक्र बदलत राहतात आणि फक्त तात्पुरत्या चमकेवर उभ्या असलेल्या गुंतवणुकी अनेकदा पुढच्या टप्प्यात अडखळतात.

म्हणूनच अनुभवी गुंतवणूक ही फक्त आज काय चांगलं चाललं आहे हे निवडण्याबद्दल नसते, तर वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये काय टिकू शकतं हे समजून घेण्याबद्दलही असते. टिकाऊपणा महत्त्वाचा असतो.

पोर्टफोलिओ एका सेक्टरवर, एका ट्रेंडवर किंवा एका बाजारमूडवर अवलंबून नसावा. बदलत्या परिस्थितीतही तो स्थिर राहू शकला पाहिजे. इथे विविधीकरण शांतपणे आपलं काम करत असतं. पोर्टफोलिओमधील प्रत्येक फंड दरवर्षी सर्वोत्तम परतावा देण्यासाठी नसतो. काही स्थिरता देतात, काही अस्थिरतेचा परिणाम कमी करतात, काही वेगवेगळ्या टप्प्यांत चांगली साथ देतात. एकत्रितपणे ते संतुलन तयार करतात. परंतु संतुलन अल्पकालात फार आकर्षक दिसत नाही.

खरं तर दीर्घकालीन संपत्ती निर्माण होणं बाहेरून खूप साधं दिसतं. रोज उत्साह नसतो. फक्त रचना, संयम आणि सातत्य शांतपणे काम करत असतं, पण तुलना हा प्रवास बिघडवते. जेव्हा गुंतवणूकदार सतत इतरांच्या परताव्याशी तुलना करू लागतात, तेव्हा ते हळूहळू आपल्या मूळ उद्दिष्टापासून दूर जाऊ लागतात. मग गुंतवणूक ही उद्दिष्टांपेक्षा फक्त परताव्याच्या मागे धावण्याची गोष्ट बनते, आणि अशी धावपळ थकवणारी असते.

मजबूत पोर्टफोलिओ तो नसतो जो काही महिन्यांसाठी सर्वात जास्त चमकतो. मजबूत पोर्टफोलिओ तो असतो जो बदलत्या काळातही स्थिर राहतो. कारण तात्पुरती चमक लक्ष वेधून घेते, पण टिकाऊपणा शांतपणे संपत्ती निर्माण करत असतो. गुंतवणुकीत एका टप्प्यात प्रभावी दिसण्यापेक्षा अनेक बदलत्या चक्रांत स्थिर राहणं जास्त महत्त्वाचं असतं.

शांत ठेवा, स्पष्ट ठेवा.

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# मुरुम चोरांचा पाठलाग करणाऱ्याला 'जेसीबी'ने दिली धडक; एकाचा मृत्यू

## एक जखमी, दोघांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील धनगरवाडी परिसरातून बेकायदेशीरपणे मुरुम चोरी करून पळून जाणाऱ्या चोरांचा पाठलाग करणाऱ्या दोन तरुणांच्या दुचाकीला जेसीबी चालकाने जाणीवपूर्वक जोराची धडक दिली. या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जेसीबी चालकासह दोघांच्या विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विजय दत्तु कजबे (वय ३८, रा. तपोवनरोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी जखमी झालेले असून प्रदीप चिंचने या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. २८ मे रोजी मध्यरात्री धनगरवाडी गावच्या शिवारातील हनुमान मंदिराजवळील एका प्लॉटमधून काही लोक जेसीबीच्या सहाय्याने मुरुम चोरी करत असल्याची माहिती फिर्यादी विजय कजबे यांना मिळाली होती. त्यानुसार ते घटनास्थळी गेले असता, आरोपी राम म्हस्के आणि त्याचा जेसीबी चालक तेथून वाहनांसह जेऊर गावाच्या दिशेने पळून जात होते. विजय कजबे आणि त्यांचा मित्र प्रदीप चिंचने यांनी आपल्या मोटार सायकलवरून (क्र. एम.एच. १६ बी.जे. २१२६) या चोरांचा पाठलाग केला. अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्यावरील जरे वस्तीजवळ त्यांनी जेसीबीला अडवण्याचा प्रयत्न केला.

यावेळी जेसीबी चालकाने पळून जाण्याच्या उद्देशाने आपले वाहन भरधाव वेगात चालवले. आपल्या या कृतीमुळे कोणाचा जीव जाऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही, त्याने कजबे यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली व त्यांना काही अंतरापर्यंत फरपटत नेले. या अपघातात प्रदीप चिंचने यांचा मृत्यू झाला, तर विजय कजबे हे जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपी राम म्हस्के व जेसीबी चालक या दोघांच्या विरुद्ध २९ मे रोजी रात्री सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे पुढील तपास करत आहेत.

# श्रीमती लताबाई गुगळे यांचे दु:खद निधन



नगर - येथील श्रीमती लताबाई नवनीत गुगळे (वय ७४, रा.विजया रेसिडेन्सी, चितळे रोड) यांचे २९ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कापड बाजारातील श्रेयस गारमेंटस्‌चे संतोष गुगळे, वर्षा कटारिया, हर्षा कटारिया, मंजू गांधी (रा.जामखेड) यांच्या त्या मातोश्री होत.

# नगर व भिंगारमध्ये सार्वजनिक ठिकाणी टाकले जनावरांच्या मांसाचे अवशेष; दोन गुन्हे दाखल

नगर - राज्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास बंदी असतानाही नगर व भिंगार मध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्यांचे निरुपयोगी अवशेष उघड्यावर टाकल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकारामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी अज्ञात समाजकंटकांवर कोतवाली व भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नगरमधील माळीवाडा परिसरात ब्राम्हण गल्लीतील सौभाग्य सदन मंगल कार्यालयाजवळ रोडच्या कडेला कोणीतरी अज्ञात इसमाने जनावरांचे फुफ्फुस सदृश्य मांस टाकून दिले होते. २८ मे रोजी रात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात दुर्गंधी पसरून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

याप्रकरणी महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक आनंदराव चांदणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २७१ आणि २९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

दुसरी घटना भिंगार जवळील ब्रम्हतळे परिसरात २९ मे रोजी सकाळी उघडकीस आली. येथील मोकळ्या पटांगणात गोवंश जनावरांची कत्तल करून त्यांचे निरुपयोगी अवशेष उघड्यावर टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या कृत्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. या प्रकरणी पो.कॉ. प्रमोद मधुकर लहरे यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २७१ आणि ३२५ अन्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### सामाजिक शांतता बिघडविण्याचा प्रयत्न होतोय का?

महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश हत्या बंदीचा कायदा असतानाही अशा प्रकारे जनावरांची कत्तल करून अवशेष उघड्यावर टाकत शहर परिसरात काही समाज कंटकांकडून सामाजिक शांतता बिघडविण्याचा प्रयत्न होतोय का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे. शहरात या पूर्वीही अशा प्रकारची कृत्ये करून धार्मिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. असे प्रकार वारंवार घडत असल्याने शहरातील धार्मिक तणावात वाढ होत असल्याने पोलिसांनी या दोन्ही घटनांचा सखोल तपास करण्याची आवश्यकता आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे या अज्ञात समाज कंटकांचा शोध घेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण; गुन्हा दाखल

नगर - शहरातील मार्केट यार्ड परिसरातील शिवाजी महाराज पुतळ्यासमोर पुढे असलेल्या दुचाकीस्वाराला हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून वाद होऊन एका तरुणाला आणि त्याच्या मित्राला लाकडी दांडक्याने व लोखंडी रॉडने बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आठ ते नऊ जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुस्तकीम ख्वॉजामियाँ सय्यद (वय २०, रा. आलमगीर, भिंगार) याने २९ मे रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी युवक २७ मे रोजी दुपारी १२.१५ च्या सुमारास आपल्या दुचाकीवरून जात होता. त्याने त्याच्या पुढे असलेल्या एका अनोळखी दुचाकी चालकाला बाजू मिळण्यासाठी हॉर्न वाजविला. याचा राग आल्याने त्या अनोळखी दुचाकीस्वाराने मुस्तकीम याला रस्त्यात गाठून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मुस्तकीम याने विचारणा केली असता, आरोपीने त्याला जागेवरच थांबण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपीने तात्काळ मोबाईलवर संपर्क साधून आपल्या इतर सात ते आठ मित्रांना घटनास्थळावर बोलावून घेतले. या सर्व आरोपींनी मिळून मुस्तकीम याला लाकडी दांडक्याने आणि लोखंडी रॉडने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला आलेला मुस्तकीमचा मित्र सादिक शेख यालाही आरोपींनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यामध्ये मुस्तकीम जखमी झाला असून, त्याच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. रुग्णालयातून मिळालेल्या जबाबाच्या आधारे कोतवाली पोलिसांनी अनोळखी दुचाकीस्वार आणि त्याच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

# जागेच्या वादातून व्यावसायिकाला धारदार शस्त्राने मारहाण

नगर - शहरातील लालटाकी भागातील मिसगरचाळ येथे जागेच्या कारणावरून झालेल्या वादातून एका आकाश कंदील व्यावसायिकाला धारदार शस्त्राने आणि लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना २७ मे रोजी घडली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोसिन वसिम खान (वय ३८, रा. मिसगरचाळ, लालटाकी, अहिल्यानगर) यांनी २९ मे रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे हे आपल्या कुटुंबासह राहून आकाश कंदील बनवण्याचा व्यवसाय करतात. त्यांचा सलमान अब्दुल शेख याच्यासोबत जागेचा जुना वाद सुरू आहे. याच वादाच्या कारणावरून ही मारहाणीची घटना घडली.

मोसिन खान हे बाजार आणण्यासाठी रस्त्याने जात असताना, रिक्षातून सलमान अब्दुल शेख हा तिथे आला. त्याच्यासोबत आधीच तिथे उभे असलेले इरफान इक्बाल शेख, हुजेब युसुफ सय्यद आणि अनिस इक्बाल शेख हे सर्वजण फिर्यादीजवळ आले. 'तुला घर द्यायचे की नाही' असे म्हणून सलमान याने फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. खान यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, त्याचा राग येऊन सलमानने त्यांच्या उजव्या गालावर जोरात चापट मारली. तसेच त्याच्या कमरेला असलेल्या धारदार वस्तूने खान यांच्या हातावर वार करून त्यांना जखमी केले.

त्यानंतर त्याच्यासोबत असलेल्या इरफान शेख, हुजेब सय्यद आणि अनिस शेख यांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी देऊन सर्वजण तिथून पसार झाले. मारहाणीत जखमी झालेल्या खान यांना पोलिसांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवले. उपचार घेतल्यानंतर खान यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी चौघा आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल इनामदार करत आहेत.

# नगरमध्ये पूर्ववैमनस्यातून दांपत्याला मारहाण करत महिलेचा विनयभंग

नगर - पूर्ववैमनस्यातून एका महिलेचा विनयभंग करून तिच्या पतीला लाकडी दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना बालिकाश्रम रस्त्यावरील नीलक्रांती चौक परिसरात २९ मे रोजी सकाळी १० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी रोहित राजू आल्हाट (रा. नीलक्रांती चौक) याच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला तिच्या कुटुंबासह नीलक्रांती चौक परिसरात राहते. त्यांचे आरोपी रोहित आल्हाट याच्यासोबत जुने वाद आहेत. पीडित महिलेच्या कुटुंबाने आरोपीविरुद्ध पूर्वी एक गुन्हा दाखल केला आहे. याच कारणाचा राग मनात धरून आरोपीने हे कृत्य केले. २९ मे रोजी सकाळी पीडित महिला घरामध्ये काम करत असताना आरोपी अचानक घरात घुसला. त्याने महिलेशी अत्यंत असभ्य वर्तन करून तिचा विनयभंग केला. पीडितेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिला अश्लील शिवीगाळ केली.

यानंतर आरोपीने नीलक्रांती चौकात पीडितेच्या पतीला गाठले. तेथे आरोपीने त्यांना अडवून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच लाकडी दांड्याने त्यांच्या हातावर, पोटावर आणि बरगडीवर जबर प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. केस मागे न घेतल्यास जीवाने मारण्याची धमकी देऊन आरोपी तेथून पसार झाला.

या घटनेनंतर पीडित दांपत्याने तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी रोहित राजू आल्हाट याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश चव्हाण करत आहेत. चौकातील या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# आजोबावर गोळीबार करणारा नातू गावठी कट्ट्यासह जेरबंद

नगर - भाऊबंदकीच्या वादातून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याच्या रागातून आजोबावर गावठी कट्ट्यातून गोळीबार करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करून पसार झालेल्या नातवाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुळा धरण परिसरात पकडले आहे. प्रवीण बाबासाहेब कोहकडे (रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी) असे आरोपीचे नाव असून त्याच्या कडून गावठी कट्ट्यासह २ लाख ४ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी प्रवीण याने त्याचे आजोबा दगडु गंगाराम कोहकडे (रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी) यांच्यावर २९ मे रोजी सकाळी ६ च्या सुमारास त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने गावठी कट्ट्यातुन गोळीबार करुन पळुन गेला होता. याबाबत गुन्हा दाखल होताच स्थानिक शाखेच्या पथकाने आरोपीचा शोध सुरु केला. तो बारागांव नांदुर ते मुळा डॅम परिसरामध्ये संशयीतरित्या फिरत असल्याची माहिती मिळताच पथकाने त्याला पकडले. त्याच्या कडून गावठी कट्टा, ४ जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त केला आहे.

# सावेडीतील गोळीबार प्रकरणाला वेगळे वळण

नगर - शहरातील पाईपलाईन रोडवरील पुणेरी चहा परिसरात झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणाला आता धक्कादायक वळण मिळाले आहे. सुरुवातीला किरकोळ वादातून झालेला जीवघेणा हल्ला म्हणून पाहिले जात असलेले हे प्रकरण आता मोठ्या कटकारस्थानाच्या दिशेने वळल्याची माहिती पोलिस तपासातून समोर येत आहे. या प्रकरणाचा तपास करताना तोफखाना पोलिसांनी भिंगार येथील ऋतिक हरिहर याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, जखमी चिरंजीव गाढवे यानेच स्वतःवर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी दिल्याचे समोर आले आहे.इतरांना अडकविण्यासाठी लावलेल्या जाळ्यात स्वत:च अडकल्याचे पोलीस तपासात पुढे येत आले. तपासादरम्यान पोलिसांनी ऋतिक हरिहर याच्याकडून पिस्टल जप्त केले आहे. तसेच, चार अल्पवयीन मुलांच्या माध्यमातून हा हल्ला घडवून आणल्याचे तपासात समोर आल्याची माहिती पोलिस उपअधिक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उष्माघातापासून करा बचाव

उन्हाळा केवळ घाम आणि थकवाच नाही, तर अनेक गंभीर आरोग्य समस्याही घेऊन येतो. यापैकी सर्वात धोकादायक म्हणजे उष्माघात. जेव्हा एखाद्याला उष्माघात होतो, तेव्हा त्यांच्या शरीराचे तापमान झपाट्याने वाढते, त्यामुळे त्यांना त्वरित थंड करणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या कपाळावर, मानेवर, काखेत आणि हाता-पायांवर थंड पाण्याच्या पट्ट्या लावा. ओल्या कापडाने शरीर पुसणे देखील फायदेशीर ठरते. शरीरावर थेट जास्त बर्फाचे पाणी ओतू नये याची काळजी घ्या, कारण यामुळे अचानक धक्का बसू शकतो. कोमट पाण्याचा वापर करणे सर्वोत्तम मानले जाते. उष्माघाताने त्रस्त असलेल्या व्यक्तीने नेहमी हलके, सुती आणि सैल कपडे घालावेत. घट्ट किंवा जड कपड्यांमुळे शरीरातील उष्णता बाहेर पडण्यास अडथळा येतो, ज्यामुळे स्थिती आणखी बिघडू शकते. शरीर लवकर बरे होण्यासाठी त्याला पूर्ण विश्रांती देणे देखील महत्त्वाचे आहे.

## पाककला

### मराठमोळा मिसळ पाव

**साहित्य :** मिसळसाठी १ वाटी मोड आलेली मटकी, ३ कांदे बारीक चिरलेले, १ टोमॅटो चिरलेला, १ वाटी सुकं खोबरं किसलेले, ८-१० लसूण पाकळ्या, २ इंच आलं, ३ टेबलस्पून कोल्हापुरी लाल तिखट, २ टीस्पून काळा मसाला, १ टीस्पून गोडा मसाला, १ टीस्पून जिरे, अर्धा टीस्पून हळद, तेल, मीठ चवीनुसार लागेल. सजावटीसाठी जाड फरसाण, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर, लिंबाच्या फोडी आणि सोबत खाण्यासाठी लादी पाव लागतील.

**कृती :** प्रथम कुकरमध्ये मोड आलेली मटकी, हळद, मीठ व थोडे पाणी घालून दोन शिट्ट्या करून उसळ शिजवून घ्या आणि कढईत तेलावर एक चिरलेला कांदा परतून त्यात आलं-लसूण पेस्ट, टोमॅटो व गोडा मसाला घालून शिजवा, मग त्यात शिजलेली मटकी ओतून पातळसर उसळ तयार करा. कटासाठी खोबरं, एक कांदा, लसूण, आलं कोरडं भाजून मिक्सरमध्ये बारीक वाटण करा, नंतर पातेल्यात भरपूर तेल तापवून जिरे तडतडल्यावर वाटण तेल सुटेपर्यंत खमंग परतून घ्या आणि त्यात लाल तिखट, काळा मसाला व मीठ घालून २ मिनिट परता, नंतर ४ ग्लास गरम पाणी ओतून कटाला १० ते १५ मिनिटे चांगली उकळी येऊ द्या म्हणजे वर तवंग येईल. सर्व्ह करताना बाऊलमध्ये आधी उसळ घाला, त्यावर गरमागरम झणझणीत कट ओता, वरून भरपूर फरसाण, बारीक कांदा व कोथिंबीर घाला आणि बाजूला लिंबू व बटर लावून गरम भाजलेला पाव द्या. आणि सर्व्ह करावे.

## वास्तू

### घरासंबंधी महत्त्वाचे...

* घराच्या ईशान्य कोपऱ्यात जड सामान, डस्टबिन ठेवू नका. हा भाग मोकळा ठेवा.

* बंद पडलेली घड्याळे, तुटलेले काच, खराब इलेक्ट्रॉनिक वस्तू घरात ठेवू नका.

* नैऋत्य कोपऱ्यात म्हणजे दक्षिण-पश्चिम दिशेला तिजोरी ठेवा. तोंड उत्तरेकडे उघडेल असे ठेवा. घरात रोज सकाळी कापूर लावावा.

## सौंदर्य

* गरम पाण्याने केस धुऊ नका. कोमट किंवा थंड पाण्याने धुवा. यूटिकल बंद होतात, चमक येते.

* ओल्या केसांना जोरात पुसू नका, रगडू नका. टॉवेलने हलकेच दाबा. १४. घट्ट पोनीटेल किंवा अंबाडा बांधू नका. केस तुटतात.

## सल्ला

दूध नासल्यास फेकू नका. गाळून घ्या. त्याचा छान पनीर भुर्जी किंवा रसगुल्ले करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ३१ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, अनुराधा १६।१२, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. जुना मित्र भेटेल. आर्थिक व्यवहारात फायदा होईल. प्रवास घडेल.

**वृषभ :** मन प्रसन्न राहील. नवीन वस्तू खरेदीचा योग. जोडीदारासोबत वेळ चांगला जाईल. नोकरीत कौतुक होईल.

**मिथुन :** कामाचा ताण जाणवेल पण संध्याकाळी यश मिळेल. भावंडांकडून मदत मिळेल. बोलण्यातून लाभ होईल.

**कर्क :** आरोग्याकडे लक्ष द्या. घरात धार्मिक कार्य घडेल. मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल. खर्च वाढेल.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. सरकारी कामात यश मिळेल. प्रेम प्रकरणात पुढे जाल. वडिलांचे सहकार्य मिळेल.

**कन्या :** अडकलेले पैसे परत मिळतील. शत्रू शांत बसतील. नोकरीत बदलाचा विचार कराल. प्रवासात काळजी घ्या.

**तूळ :** व्यवसायात नवीन ऑर्डर मिळेल. जोडीदाराची तब्येत सांभाळा.

**वृश्चिक :** कोर्ट-कचेरीची कामे मार्गी लागतील. कर्ज फेडता येईल. स्पर्धा परीक्षेत यश मिळेल. राग टाळा.

**धनु :** संततीसाठी चांगला काळ. शिक्षणात प्रगती होईल. शेअर बाजारातून लाभ. प्रवासातून फायदा होईल.

**मकर :** घर/गाडी दुरुस्तीवर खर्च होईल. आईच्या तब्येतीची चिंता सतावेल. जमिनीच्या व्यवहारात यश.

**कुंभ :** धाडस वाढेल. लहान प्रवास घडेल. भावंडांशी मतभेद मिटतील. नवीन कामाची सुरुवात कराल.

**मीन :** बोलण्याने कामे होतील. धनलाभाचा योग प्रबळ आहे. कुटुंबात गोड बातमी मिळेल. उधारी देऊ नका. मागील उधारी वसुल होईल.

## शब्दगंध क्र. ७४४१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ■ | ५ |
| ६ | | | ■ | ७ | | ८ | |
| ९ | | ■ | १० | | | | ■ |
| | ■ | ११ | | | ■ | १२ | १३ |
| १४ | | | | ■ | १५ | ■ | |
| ■ | ■ | | ■ | १६ | | १७ | |
| १८ | १९ | | ■ | | ■ | २० | |
| २१ | | ■ | २२ | | ■ | ■ | |

**आडवे शब्द :-** १) 'पाच'च्या पाढ्यात असलेली एक विषम संख्या ६) पाणी अडविण्यासाठी नदीपात्रात वगैरे बांधलेली आडवी भिंत ७) जेथे कामगारांद्वारे वस्तू उत्पादित केल्या जातात ती जागा ९) लढाई; युद्ध; युद्धभूमी; वाळवंट १०) धन; वित्त ११) लुळा; लंगडा १२) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन १४) दुरुस्ती १६) जिचा पती वारला आहे अशी स्त्री; विधवा १८) दोरा बांधून आकाशात उडविण्याचा एक क्रीडा प्रकार २०) शेत; जंगल; अरण्य; वावर २१) मस्ती; जोर २२) नेत्र; नयन; फासा

**उभे शब्द :-** १) पंधरा दिवसांचा कालावधी; पक्ष २) पाय; पद ३) संतती; वस्त्राचे विणकाम ४) गाईचे दूध ५) परवड; दुर्दशा ७) एक पक्षी; काग; काक; वायस ८) मिठाची चव १०) कोर; कंगोरा; काठ ११) पंढरपूरचा देव १३) मुभा; स्वातंत्र्य; मोकळीक १५) हेतू; योजना १६) खिडकी; वातायन; झरोका १७) रसा; वसुधा; पृथ्वी १८) पंख; दुसरा १९) घट्ट; गच्च

### शब्दगंध क्र. ७४४० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ट | पा | ट | न | ग | र | ■ |
| म | क | र | ■ | वे | ड | स | र |
| दा | म | ■ | फ | त | वा | ■ | ख |
| र | क | म | वा | र | ■ | ■ | वा |
| ■ | ■ | द | रा | ■ | ■ | वा | ली |
| पं | ग | त | ■ | वा | क | डा | ■ |
| क | म | नी | य | ■ | म | ■ | भा |
| ■ | न | स | ती | उ | ता | ठे | व |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : काटे टोचल्याशिवाय फुलांचा सुगंध कळत नाही, दुःखाशिवाय सुखाची किंमत कळत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### एका इलेक्ट्रॉनिक वस्तूवर दुसरी इलेक्ट्रॉनिक वस्तू का ठेवू नये?

इलेक्ट्रॉनिक वस्तूंची रचना आणि त्यांचे कार्य लक्षात घेतले तर एकावर एक वस्तू ठेवणे धोक्याचे का आहे हे सहज समजते. प्रत्येक टीव्ही, सेट-टॉप बॉक्स, वाय-फाय राऊटर, म्युझिक सिस्टिम किंवा लॅपटॉपच्या मागे किंवा बाजूला हवेसाठी छोटे छिद्रे म्हणजेच व्हेंट्स दिलेले असतात. या व्हेंट्समधून गरम हवा बाहेर पडते आणि मशीन थंड राहते. जेव्हा आपण त्यावर दुसरी वस्तू ठेवतो तेव्हा हे व्हेंट्स झाकले जातात, त्यामुळे आतली उष्णता बाहेर पडू शकत नाही आणि डिव्हाइस ओव्हरहीट होते. सतत गरम राहिल्याने सर्किट बोर्ड, चिप्स आणि वायरिंग कमकुवत होतात, त्यामुळे वस्तू लवकर खराब होते किंवा शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याचा धोका वाढतो. तसेच, प्रत्येक इलेक्ट्रॉनिक वस्तू काम करताना इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी निर्माण करते. दोन वस्तू एकमेकांजवळ किंवा एकावर एक ठेवल्या तर त्यांच्या लहरी एकमेकांवर परिणाम करतात, ज्याला इंटरफेरन्स म्हणतात. यामुळे टीव्हीचे पिक्चर हलणे, वाय-फायचा स्पीड कमी होणे, स्पीकरमधून घरघर आवाज येणे असे प्रॉब्लेम्स सुरू होतात. याशिवाय, वजनाचाही विचार करायला हवा. टीव्ही किंवा मॉनिटरचे कव्हर हलके प्लास्टिकचे असते. त्यावर जड सेट-टॉप बॉक्स किंवा डीव्हीडी प्लेयर ठेवल्यास कव्हर दबू शकते किंवा स्क्रीनवर प्रेशर येऊन आतून डॅमेज होऊ शकते.

### वादळ


एक कोळी रोज समुद्रात मासे पकडायला जायचा. एक दिवस अचानक वादळ आले, त्याची नाव उलटली. तो लाकडाचा तुकडा धरून वाहत एका बेटावर पोहोचला.

बेट ओसाड होते, खायला काहीच नव्हते. त्याने देवाला दोष दिला, मला इथे मरायला आणलेस? त्याने कष्टाने झोपडी बांधली, मासे वाळवून साठवले.

एके रात्री तो मासे शोधायला गेला, मागे झोपडीला आग लागली सगळे जळून गेले, तो ढसाढसा रडला, देवा, हे काय केलेस? तेवढ्यात दूर एक बोट आली.

खलाशी म्हणाला, आम्ही तुझ्या आगीचा धूर पाहिला म्हणून आलो. कोळ्याला कळले, झोपडी जळाली म्हणूनच तो वाचला तो देवाचे आभार मानू लागला बोटीतून तो सुखरूप घरी परतला. आयुष्यभर तो हा प्रसंग विसरला नाही.

बोध : संकट कधी कधी वरदान ठरते, देवावर विश्वास ठेवा.



## जीवन का अमृत (भाग १)

### उनका वैराग्य

८१. संसार इतिहास के उस दौर में पहुँच चुका है, जबकि रूहानियत की जोरदार बारिश होगी, जैसा कि धर्म ग्रंथों और संतो-महात्माओं ने भविष्यवाणी की थी।

८२. सतगुरु की दया-मेहर से बहुत लंबे समय से छुपी हुई सचाईयां संसार को ज्ञात होंगी, खासकर उनको, जिनके पास इन्हें देखने वाली आँखें हैं और इन्हें सुनने वाले कान हैं। अगर कोई जीते जी पंडित है, तो मर के भी पंडित ही रहेगा; अगर कोई जीते जी पंडित नहीं, तो मर के पंडित कैसे हो जाएगा? इस इंसानी चोले में हमें एक सुनहरी मौका मिला है, जबकि हम जितना चाहें, उतना विकसित हो सकते हैं और सांसारिक वस्तुओं के मोह को त्याग सकते हैं। जब कोई सतगुरु के प्रति अत्याधिक प्रेम और भक्ति विकसित कर लेता है और रुहानी तौर से इतनी तरक्की पा लेता है। कि उसे सांसारिक वस्तुओं से वैराग्य हो जाता है, तो उसे जमीनी जिंदगी में लौटने की जरूरत नहीं होती, बल्कि वह अंग-संग रहने वाली गुरु-सत्ता के मार्गदर्शन में, आंतरिक मंडलों में चढ़ाई करेगा।

यदि नामलेवा केवल वैसा करें, जैसा कि उन्हें बताया गया है, तो अवश्य ही वे ज्योति और परमानंद के मंडलों में चढ़ाई करेंगे और सतगुरु के नूरी एवं मनोहर स्वरूप से आमने-सामने होकर मिलेंगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### जग जिंकाल

शिवानीदीदी हरकत नाही. आता किमान आपण विचार बदलायला सुरुवात केली आहे. दिवसातून एकदा जरी आपल्या मूळ ओळखीचं स्मरण केलं तरीही ती एक सुरुवात असेल, दशप्राणी असेल. नाहीतर पुनरावृत्तीची पुनरावृत्ती होतच राहील.

ट्रेडमिलवर व्यायाम करताना काय होतं? एकदा आपण त्यावर चालायला सुरुवात केली की आपण एकाच दिशेने चालत राहतो. ती दिशा बदलू शकत नाही.

पण आता त्या ट्रेडमिलवरून खाली उतरा.

सुरेश ओबेरॉय : आणि दिशा बदला.

शिवानीदीदी हो. दुःख आणि राम स्वाभाविक किंवा नैसर्गिक आहे, असा विचार करण्याऐवजी आपल्याला पाहिजे तेव्हा स्वतःला बदलता आलं पाहिजे. शांती, प्रेम आणि परमानंद आपल्यासाठी स्वाभाविक आहेत. स्वतःला जागणं ओळ आणि स्वतःला भेटणं ह्याचा अर्थ म्हणजे आपण स्वतःशी नातं तयार करत आहोत. आपण इतरांना समजू शकत नाही, असं अनेकदा म्हणतो. पण आपण स्वतःलाही समजू शकतो का?

सुरेश ओबेरॉय :

माझी आई मला सांगायची, जर तुम्ही तुमचं मन जिंकलं तर तुम्ही जग जिंकाल. आणि मग सगळे तुमच्यावर प्रेम करतील आणि तुमचा आदर करतील.' शिवानीदीदी संपूर्ण जग तुमचा आदर का करेल?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बाप : पेपर कसा गेला?

पोरगा : प्रश्न सगळे माझ्या ओळखीचेच होते,

पण उत्तरे मात्र अनोळखी निघाली.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* २०२६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा कुठे होणार आहेत?

– मिलान-कोर्टिना

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'लाळघोटे...'

जगात अब्जावधी व्यक्ती आहेत. म्हणजेच अब्जावधी स्वभावाच्या व्यक्ती आहेत. मी स्वतः चांगलं असावं की वाईट असावं हे फक्त मी आणि मीच ठरवु शकतो. खरं तर आपल्याला अर्थात मला ओळखणाऱ्या किती व्यक्ती आहेत ? हा प्रश्न मी स्वतःला विचारला की उत्तर मिळेल. काही हजार व्यक्ती मला ओळखतात. त्या व्यक्ती मला ओळखतात हे खरं आहे असं गृहित धरलं तर ते ओळखणं चांगल्या अर्थाने आहे की वाईट अर्थाने आहे हे अधिक महत्वाचं, समजा मला ज्या व्यक्ती ओळखतात त्यांपैकी मी किती व्यक्तींना ओळखतो हे सुध्दा तितकंच महत्वाचं आहे. आपल्या जवळपास असणाऱ्यांचे गुण अथवा अवगुण कळत, नकळत आपल्यात येत असतात हे वास्तव सुध्दा स्वीकारलंच पाहिजे.

आपल्याला ओळखणाऱ्या व्यक्ती ह्या विविध प्रकारच्या स्वभावाच्या असतात, आहेत हे मान्य केलंच पाहिजे. मनुष्य जीवनात स्वाभिमानी असणं हे निश्चितच इतरांकरिता प्रेरणादायी, आनंददायी असतं. स्वाभिमान गहाण ठेवला तर जगण्यात काय अर्थ आहे हे एकदा तरी स्वतःला सांगिलच पाहिजे. आमचा एक परिचित एका खाजगी कार्यालयात नोकरी करतो. त्याच्या कार्यालयातील एखाद-दुसरा सोडला तर अनेकजण स्वाभिमानी आहेत. त्या एक-दोघांना हा परिचित लाळघोटे म्हणतो. स्वाभिमान हा शब्द ह्या एक-दोघांनी चांगल्या प्रकारे वाचला आहे. पण त्या शब्दाशी ह्या दोघांचा दुरान्वये संबंध नाही कारण लाळघोटेपणा. स्वार्थी, अप्पलपोटे हे लाळघोटेपणात हुशार असतात असं मी ऐकलं आहे. स्वतःचा काही फायदा करुण घेणं, स्वार्थ साधणं हे लाळघोट्यांच्या रक्तात असतं असं मी ऐकलंय. साहेब अथवा बॉस काही म्हणाले की त्यांचा शब्द वरचेवर झेलणं ही ह्या लाळघोट्यांची खासियत असते. ते शब्द चुकीचे आहेत की बरोबर आहेत ह्याची खातरजमा करुन घ्यायची आहे. तो शब्द पाळायचा म्हणजे साहेब, बॉस खुष. ते खुष म्हणजे स्वार्थ साधणं अत्यंत सोप्पं काम होतं. उगीचच खुशामत करायची, हां जी हां जी करायचं. आपलं पद, वय काय ह्याचा विचार न करता स्वार्थासाठी झुकणारांबद्दल नक्कीच वाईट वाटतं. नवीन बॉस आले की त्यांचं कौतुक करायचं. ते खुपच चांगले आहेत हे वारंवार त्यांनाच ऐकवायचं.

ते एकदा आपल्यावर खुश झाले की घरी जेवायला बोलवायचं अर्थात सपत्नीक. जेवण झालं की सौभाग्यवतींच्या हस्ते बॉसच्या पत्नीला साडी भेट द्यायची. पुन्हा बॉसचं कौतुक करायचं. हे सगळं व्यवस्थित झालं म्हणजे सदर बॉस आपल्या कार्यालयात असेपर्यंत गैरफायदा घ्यायला उपयोगी पडतं. म्हणेज कार्यालयीन वेळेत स्वतःची खाजगी काम भलेही तीन तास लागले तरी हरकत नाही, अशी कामं वारंवार करायची. म्हणजे अर्ध्या दिवसाची तर कधी पूर्ण दिवसाची रजा शिल्लक राहते शिवाय घरी किराणा मालाचे दुकान साईड बिझनेस म्हणून असेल तर ठोक भावात किराणा घेऊन तो कार्यालयीन वेळेत दुकानात नेऊन पोहोचवायचा. कार्यालयात यायचं. लाळघोटेपणाचे प्रचंड फायदे आहेत ते फक्त स्वाभिमान गहाण ठेऊन आणि अप्रामाणिक वागुणच मिळवता येतात. अशा ह्या लाळघोट्यांना काही व्यक्ती 'लाळे' म्हणतात तर काही व्यक्ती अशांना लुचे म्हणतात. स्वाभिमानानं जगलं की त्याचा आनंद, समाधान स्वतःला मिळतं ते चिरकाल टिकतं. लाळघोटेपणा करुन आपण स्वतःची पत कमी करुन घेतो. पण ज्यांच्या रक्तात फक्त आणि फक्त स्वार्थ आहे, अधिकाधिक पैसा कमावण्यासाठी कोणत्याही थराला जायची तयारी आहे अशा लाळघोट्यांना फक्त पैसा प्रिय असतो व्यक्ती प्रिय नसते. लाळघोटेपणा करुण प्रचंड पैसा कमावता येईल, बढतीही मिळेल पण त्याचं समाधान मिळणार नाही. स्वाभिमान गहाण ठेऊन मिळालेली कोणतीच गोष्ट कायमस्वरुपी आनंद, समाधान मिळवुन देणारी नसते.

आपल्या अवती-भोवती पाहिलं की लाळघोट्यांची संख्या कमी नाही. लाळघोटेपणा करुन कमावलेला अधिकचा पैसा, अधिक आनंद मिळवुन देणार नाही, सुखी-समाधानी आहे हे वाक्य लाळघोटे कधीच उच्चारु शकणार नाही कारण स्वाभिमान गहाण टाकला की वागणं आणि जगणं वर-वरचं होतं. मनापासून जीवनाचा आस्वाद, आनंद, सुख, समाधान तेव्हाच मिळेल जेव्हा आपण स्वाभिमान गहाण न ठेवता आपणा करत असलेलं काम, देत असलेली सेवा लाळघोटेपणा न करता देऊ. मनुष्यजन्म वारंवार मिळणारा नाही मग स्वाभिमानाने जगलो तर समाधान – सुख मिळेल. प्रत्येकाने विचार केला तर लक्षात येईल की स्वाभिमानानं जगणं फार आनंददायी आहे, समाधानकारक आहे. स्वाभिमानाने काम केलं, सेवा दिली तर जे काही मिळेल ते भलेही उशिरा मिळेल पण कायमचा आनंद देणारं असेल. स्वतःची, कुटुंबाची काळजी घेऊया, स्वाभिमानानं जगुया.

(लेख क्र.६०३)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कोबी

३) कोबीमध्ये 'अ', 'ब' व 'क' जीवनसत्त्व असल्यामुळे त्याच्या सेवनाने शरीरातील रक्तपेशींचे आरोग्य सुधारून रोगप्रतिकारशक्ती वाढते.

४) वाढत्या वयातील मुलांची वाढ चांगली होऊन शक्ती प्राप्त होण्यासाठी कोबीचा आहारात समावेश करावा.

५) कोबीत असलेल्या टार्टारिक ॲसिडमुळे जेवणातील साखर व पिष्टमय पदार्थ यांचे चरबीत होणारे रूपांतर थांबते व त्यामुळे वजन घटण्यास मदत होते.

हणून स्थूल व्यक्तींनी बांधेसूद शरीर राहण्यासाठी रोज कच्चा कोबी १०० ग्रॅम खावा. कोबीमध्ये कॅलरीज कमी असल्यामुळे वजन कमी होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# दुर्योधनासारखी घमेंड करणारांचा नाश निश्चित होतोच

**रेवतीनंदन दास यांचे प्रतिपादन; नगरमध्ये श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळा**

नगर – धनवान, सौंदर्यवान, उच्च शिक्षण घेतलेले, ऐश्वर्य उपभोगणारे आणि घमेंड असणारे भगवंताचे नाम घेऊ शकत नाहीत. दुर्योधनासारखी घमेंड करणारांचा नाश निश्चित होतोच,असे प्रतिपादन ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले.

येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे तृतीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, मगनभाई पटेल, अशोक कानडे, मदन कांबळे, राजूभाई पटेल, मिलिंद चवंडके, डॉ.सौ.अंजली फाटके यांच्यासह स्त्री-पुरूष भाविक उपस्थित होते. ॲड कुंदा दांगट यांचा महाप्रसाद सेवेबद्दल ग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला.



श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, भरपूर पैसेवाले उत्तम पक्वान्नाचे ताट समोर असूनही डायबेटिसमुळे खाऊ शकत नाहीत. सर्व सुख साधन उपलब्ध असूनही शांतपणे झोपू शकत नाहीत. पैसा शाश्वत सुख-समाधान मिळवून देऊ शकत नाही. फक्त भगवंताचे नामच ते देऊ शकते. गंगास्नान पाप नष्ट करते पण पापवृत्ती नष्ट करू शकत नाही. गीता आणि भागवत पाप वृत्ती नष्ट करून परम पवित्र भगवंताची भेट घडवतात.

मृत्यूवर विजय मिळवून देणारी आणि मृत्यूच्या डोक्यावर पाय ठेवून भगवंत धामाला घेऊन जाणारी भागवत कथा आहे. संसाराचा ताप घालवून शितलता प्रदान करणारी आहे. मोह, माया, मद, मत्सर, लोभ नष्ट करणारी आहे. भगवान श्रीकृष्णाचे निरंतन चिंतन-मनन करावे. ज्या घरात भगवंताच्या कथेचे निरूपण आणि श्रवण होते तेथे भूत पिशाच्च, बाहेरची बाधा राहूच शकत नाही. कथा श्रवणाने मंगलमय जीवनाचा आनंद मिळतो. भागवत ग्रंथाची भेट दिल्यास वैकुंठ प्राप्ती होऊन. भगवंताचे दर्शन घडते. भगवंताच्या भक्तीचे तेज चेहऱ्यावर झळकते.जीवनात दु:ख आले तरच भगवंताची आठवण होते. भगवंताचे स्मरण रहावे आणि दर्शन घडावे म्हणून दु:ख मागणारी महाराणी कुंती आहे. संसारातील दु:ख भोगत भगवंत नामस्मरण करावे, हे कुंती स्वकृतीमधून दाखवून देते.

धर्म आणि समाजाच्या परंपरेतून येणारी पती-पत्नी नात्यातील पावित्र्यता न समजणारे युवक-युवती एकमेकांना धोके देण्याचे दु:ख देत आहेत. मात्र भगवान कधीही धोका देत नाहीत. धोक्यापासून सावधान रहाण्याचा संदेश भागवत कथा देते, असे श्रीमान रेवतीनंदन दास यांनी सांगितले.

भागवत कथा सुरू झाल्यापासून कडाक्याच्या उन्हाची तीव्रता कमी होऊ लागली आहे, अशा प्रतिक्रिया श्रोतृवृंदांमधून उमटत आहेत.

## ३१ मे रोजी एमपीएससीची संयुक्त पूर्व परीक्षा; जिल्ह्यातील १५ उपकेंद्रांभोवती प्रतिबंधात्मक आदेश

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित 'महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-' ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्ह्यातील १५ परीक्षा उपकेंद्रांवर होणार आहे. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आयोगाचे केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (बीएनएसएस) च्या कलम १६३ (३) अंतर्गत सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. या परीक्षेसाठी अहिल्यानगर जिल्हा केंद्रावर एकूण ५ हजार ३७३ उमेदवार प्रविष्ट झाले आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ३ समन्वय अधिकारी (वर्ग-१ उपजिल्हाधिकारी संवर्ग), १ भरारी पथक अधिकारी, १५ उपकेंद्रप्रमुख, ५३ पर्यवेक्षक, २४६ समवेक्षक, ४ सहायक, ३० लिपिक, १५ केअरटेकर, १५ बेलमन, १५ शिपाई, ५३ पाणीवाटप कर्मचारी आणि २० वाहनचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उमेदवारांना परीक्षा केंद्रावर सकाळी ९.३० वाजल्यापासून प्रवेश दिला जाणार आहे. परीक्षेतील उत्तरे लिहिण्यासाठी केवळ काळ्या शाईचे बॉलपॉइंट पेन वापरणे आवश्यक असून आयोगाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मोबाईल, कॅल्क्युलेटर, डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन आदी दूरसंचार साधने परीक्षा केंद्र परिसरात किंवा परीक्षा दालनात आणण्यास तसेच स्वतः जवळ बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरून स्वतः डाउनलोड करून घ्यावीत. दुय्यम प्रवेशपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिली जाणार नसल्याची नोंद उमेदवारांनी घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरातील एसटीडी बुथ, फॅक्स व झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# प्रेरणादायी अक्षरधन

## राखावी बहुतांचि अंतरे

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




त्याला प्रत्येक जण मान देतो, कारण तो सगळ्यांना घेऊन चालतो. त्याच्या सहवासानं प्रत्येक जण सुखावतो. तो मृदू बोलतो. कोणाचे एवढेही नुकसान होणार नाही याची काळजी घेतो. कुणी अडला, तर त्याला सर्वतोपरी मदत करतो. कुणीही वेळीअवेळी त्याला भेटू शकतो. दुसऱ्या चिंता घालवायला तो तनमनधने झिजतो, म्हणूनच तर सगळ्यांना आपला वाटतो.

समाजाचं भलं करणाऱ्याला परोपकार आणि मनाचा समतोल हे गुण राखावेच लागतात. आपण खूप केलंय आजवर लोकांसाठी, तेव्हा आता लोकांनीच धावावं माझ्यापाठी. असे म्हणणे ही बुद्धी नाठी. तुम्ही असता मोठे, पण त्याचे भोवतातही तोटे. एखाद्या वेळी जरी थोडे जनसेवेत चुकले, किंवा वागताना डावपेच हुकले की तुम्ही एकदम लोकांच्या मनातून उतरले.

ऋग्वेदात ऋषी म्हणतात, अहो इंद्र केवढा उपकारक। लोकांसाठी प्राणांची बाजी लावून लढला. एखाद्या आज्ञाधारक नोकरासारखा राबला. कुणीही केव्हाही बोलावले तरी मदतीला धावला. पण एवढे करूनही एकदा कुठे तरी चुकला, तर लोकांनी आरडाओरडा केला.

अहो, चांगला धनलाभ व्हायचा होता. इंद्रानं थोडा जोर लावायला हव होता. नाही लावला ना पण ? सांगून टाकावं तसं स्पष्ट त्याला. चांगली स्तुती करावी, पण त्यातून ही गोष्ट नजरेला आणून द्यावी. आहे का पूर्वी इतकंच त्याचं वजन जिकडंतिकडं? कुणी म्हणतात, तो पूर्वीचा इंद्र आता राहिलाच नाही. म्हणून वाटतं, उगाच कशाला करा त्याची स्तुती ?

पण लोकांचा स्वभाव उतावळा. लोकांचं मन राखता राखता जीव गोळा. लोकांची मनं राखणं म्हणूनच कठीण । एक होता राजा. त्यानं नदीकाठी बांधलं एक देऊळ. सुंदर सुवर्णाची मूर्ती स्थापिली. पूजेसाठी एक पुजारी नेमला. राजा रोज दर्शनाला जाई. पुजारी यथासांग पूजा करी. राजा पुजाऱ्यावर खूश होई.

एकदा काय झाले, की नदीला पूर आला. देवळात पाणी शिरले. पाण्याला ओढ भारी. त्यात ती मूर्ती हलली. पाण्याबरोबर वाहू लागली. पुजाऱ्याने पुरात उडी घेतली. पण..

दुसऱ्या दिवशी पूर उतरला. देवळात राजा व इतर सरदार आले. मूर्ती नव्हती. पुजाऱ्याला बोलावणे गेले. मूर्ती पुरात वाहून गेली असे ऐकतो, हे खरं काय? राजानं विचारलं. पुजारी होय म्हणाला. पण सरदार रागावले. पुजाऱ्याला दरबारात अपराधी म्हणून उभं केलं. पुरात उडी घेऊनही मूर्ती वाचवली नाही, हा अपराध म्हणून पुजाऱ्याला शिरच्छेदाची शिक्षा सुनावली. पण तेवढ्यात एक वृद्ध मनुष्य तिथं आला. तो एका सरदाराचा नातेवाईक होता. तो तिथं येताच म्हणाला, महाराज पुजारी अपराधी नाही. पुजाऱ्यानं पुरात उडी घेतली. पण त्याचवेळी माझी किंकाळी त्याच्या कानी पडली व मूर्ती सोडून त्यानं मला वाचवलं.

राजा विवेकी होता त्यानं पुजाऱ्याची शिक्षा माफ केली.

**– किशोर गांधी**

# आनंदधाम येथे शिखर चातुर्मास या धार्मिक पर्वाची जय्यत तयारी सुरू

**प्रवर्तक कुंदनऋषीजी यांच्या उपस्थितीत समर्पण चातुर्मास लोगोचे उद्घाटन**

नगर – समर्पण चातुर्मास हा गुरुदेव प्रवीणऋषीजी यांचा चातुर्मास हा शिखर चातुर्मास म्हणून चार महिन्याचा उत्सव साजरा होणार आहे. आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांच्या सानिध्यात हा शिखर चातुर्मास होणार असून चातुर्मास निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, व्याख्यान व धर्म प्रभावना होणार आहे, अशी माहिती अशोक (बाबुशेठ) बोरा व समर्पण चातुर्मास समितीच्या विश्वस्त यांनी दिली.

अर्हम विज्ञा प्रणेते, उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. यांचे २४ जून रोजी अहिल्यानगरमध्ये आगमन होणार आहे. २६ जुलै रोजी आनंदधाम येथे प्रवेश होणार आहे. शिखर चातुर्मास निमित्त श्री गुरु आनंद जन्मोत्सव हा मुख्य कार्यक्रम ६ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या कालावधीत साजरा होणार आहे. या कालावधीत आठ दिवस उपवास व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. २४ जून ते २६ जुलै या कालावधीमध्ये महाराज हे संपूर्ण शहरामध्ये सर्व भाविक / नागरिकांची समक्ष भेट घेणार आहेत. या चातुर्मास निमित्त होणाऱ्या व्याख्यानासाठी दररोज चार-पाच हजार भाविक सहभागी होणार आहेत. तर गुरु आनंद जन्मोत्सव निमित्त होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमात पंधरा ते वीस हजार भाविक येतील. यासाठी शिखर चातुर्मास निमित्त जय्यत तयारी आनंदधाम येथे सुरू आहे.



महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म. सा. यांच्या उपस्थितीत समर्पण चातुर्मास लोगोचे उद्घाटन करण्यात आले.

सौरभ बोरा यांनी समर्पण चातुर्मासमध्ये प्रमुख लाभार्थी म्हणून सन्मान स्वीकारला असून, त्यांनी संपूर्ण चातुर्मासमधील गौतम प्रसादी, मंडप व्यवस्था, एवं आनंद जन्मोत्सव या कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे. यासाठी सर्व विश्वस्तांनी त्यांचे आभार मानले आहे.

शिखर चातुर्मास या धार्मिक कार्यक्रमाचे उद्घाटन म्हणून समर्पण चातुर्मास या लोगोचे उद्घाटन महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म.सा. यांच्या सानिध्यात करण्यात आले. याप्रसंगी अलोकऋषीजी, चातुर्मास कमिटीचे विश्वस्त बाबुशेठ बोरा, राजेश भंडारी, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, सुरेश कांकरिया, विजय गुगळे, अभय गांधी, अभिजीत गांधी, विनोद कटारीया, संजय गुंदेचा, सचिन देसरडा हे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी चातुर्मासचे प्रमुख लाभार्थी सौरभ बोरातर्फे संजय ताथेड व किरण राका, श्रावक संघाचे रतीलाल कटारिया, सावेडी स्थानकचे अनिल कटारिया, अनिल लोढा, संतोष शेटीया, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते. अर्हम विज्ञा व आनंदतीर्थ परिवार, तसेच अहिल्यानगर येथील सर्व जैन स्थानक जसे की केडगाव, आगरकरमळा, सारसनगर, विनायकनगर, भिंगार, सावेडी, महावीरनगर, हडको, व बोल्हेगाव, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन स्थानक, जैन संघटना, युवा संघटना तसेच अहिल्यानगर तालुका जैन स्थानकच्या विश्वस्तांनी समर्पण चातुर्मासमध्ये सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगितले.

आदेश चंगेडिया म्हणाले, समर्पण चातुर्मास या लोगोमध्ये राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म. सा. यांचा फोटो दर्शविण्यात आला आहे. राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांनी दाखविलेल्या पाऊलखुणांवरच हा चातुर्मास उभा होणार आहे, असे उपाध्याय प्रवीणऋषीजी म. सा. यांनी सांगितले. आनंदऋषीजी म.सा.यांच्या शिकवणीची उजळणी म्हणून हा चातुर्मास ओळखला जाणार आहे. हा चातुर्मास येणाऱ्या पिढीसाठी आदर्शवत ठरेल, असेही ते म्हणाले.

# गुरुपालट – १ जून २०२६

सोमवार दि. १ जून २०२६ रोजी उत्तररात्री १.५० वाजता गुरु कर्क राशीत प्रवेश करीत आहे. त्याचा पुण्यकाल सोमवारी रात्री ११.५९ पासून उत्तररात्री ३.४१ पर्यंत आहे.

मेष-धनू-सिंह या राशींना अनुक्रमे ४-८-१२ वा गुरु येत असल्याने आणि लोहपादाने ज्या राशीस येत आहे. त्यांनी पीडा परिहारार्थ गुरुच्या उद्देशाने जप, दान, पूजा अवश्य करावी. कर्क, वृषभ, कुंभ, तुला या राशींना गुरु १-३-६-१० वा येत असल्याने त्यांनी जप, दान, पूजा यापैकी एखादा प्रकार केल्याने त्या पीडेचा परिहार होईल.

पीडा परिहारार्थ पुण्यकाळात जप, दान, पूजा अत्यंत आवश्यक आहे. गुरु सुवर्णपादाने झाल्यास त्याचे फळ जरी चिंता असे आहे तरी सुवर्णपादी शुभ आहे.

पीडा परिहारकारक दानवस्तू – सुवर्ण, कांसे, पुष्कराज, हरबऱ्याची डाळ, घोडा, साखर, पिवळे वस्त्र, पिवळी फुले.

जपमंत्र – देवातांच ऋषीणांच गुरु कांचनसन्निभम् ।

बुद्धीभुतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्यातिम् ।।

जप संख्या –

१९ हजार

दि. १ जून २०२६ ते दि. ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत कर्क राशीत राहील. नंतर अतिचार वेगाने दि. ३१ ऑक्टोबर २०२६ ते २३ जानेवारी २०२६ सिंह राशीत राहील आणि पुन्हा वक्री होऊन दि. २४ जानेवारी २०२७ रोजी कर्क राशीत प्रवेश करील.

पुढील लेखात गुरु फक्त कर्क राशीत आल्यावर त्याचा फलादेश सर्व राशीकरीता काय असेल? तो दिला आहे.

**प्रत्येक राशीनिहाय फलादेश**

| जन्मराशी | पाद | फल |
|---|---|---|
| कर्क-धनु-कुंभ | सुवर्ण | चिंता |
| मेष-सिंह-वृश्चिक | रोप्य | शुभ |
| मिथुन-तुला-मीन | ताम्र | श्रीप्राप्ती |
| वृषभ-कन्या-मकर | लोह | कष्ट |

### मेष – स्थावर इस्टेटीचे योग

आपल्या महत्वाकांक्षी स्वभावाला या गुरु बदलामुळे एक प्रकारचा नवीन हुरुप प्राप्त होणार आहे. या वर्षात आपल्याकडून स्थावर इस्टेटीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. नोकरदारांची बदली स्वतःच्या गावाला किंवा अगदी गावाजवळ होण्याची शक्यता. अविवाहितांचे विवाह ठरतील. व्यावसायिकदारांना नवीन कल्पना सुचतील. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी किंवा चांगल्या कल्पना सुचण्याचे योग आहेत. अविवाहितांचे विवाह ठरण्याचेय योग आहेत. थोडक्यात हे वर्ष आपणांस चांगले जाईल.

### वृषभ – संबंध सुधारतील

आपले जर जवळचे नातेवाईक, मित्र-मैत्रिणीबरोबर काम करणारे सहकारी यांच्याशी संबंध खराब झाले असतील तर ते या वर्षात सुधारतील. अविवाहितांचे विवाह ठरतील. त्यांना जोडीदार मनाप्रमाणे मिळेल. नोकरी व्यवसायात प्रगती होईल. नोकरीमध्ये वरिष्ठ आपल्यावर खुष राहतील. लेखक-प्रकाशकांना नवीन संधी प्राप्त होतील. समाजामध्ये नवीन ओळखी होतील. तसेच त्याचा फायदा आपल्या व्यवसायासाठी होईल. अचानक धनलाभाचे योग आहेत. शेअर्समध्ये फायदा होईल.

### मिथुन – आर्थिक वृद्धी होईल

आपण नेहमीच नवनिर्मितीचा ध्यास घेता. परंतू, आपला यातून आर्थिक लाभ मात्र होत नव्हते. यावर्षात मात्र आर्थिक लाभ होतील. तसेच नोकरदारांना प्रमोशन मिळण्याची दाट शक्यता आहे. आपल्याला जर एखादा दीर्घ मुदतीचा आजार असेल तर उत्कृष्ट डॉक्टर भेटतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. संतती विषयक समस्या मिटतील. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. काम-धंद्याविषयक कामे मार्गी लागतील. जुनी येणी वसूल होतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष चांगले जाईल.

### कर्क – सर्व प्रकारच्या समस्या मिटतील

आपला स्वभाव अतिशय संवेदनाशील असा आहे. त्यामुळे आपल्याला खूप मानसिक क्लेष होतात. २०२० ते २०२२ या दोन वर्षात खूपच मानसिक क्लेष झाले. ही भर आता या वर्षात भरून निघणार आहे. अविवाहितांचे विवाह ठरतील. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. संततीविषयक सर्व समस्या मिटतील. जीवनात एखादी मार्गदर्शक व्यक्ती भेटेल व तिचे मार्गदर्शन उपयोगी पडेल. आजारी व्यक्तींना डॉक्टरांचे औषधे परफेक्ट उपयोगी पडतील. विद्यार्थ्यांना यावर्षात उत्तमप्रकारे शैक्षणिक प्रगती साधना येईल. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल. एकंदरीत हे वर्ष प्रगती पथावर नेणारे आहे.

### सिंह – अध्यात्माकडे वाटचाल

आपल्या तापट स्वभावाला आता बरीच मुरड बसली आहे. सन २०२३ ते २०२५ पर्यंतचा कालखंड अतिशय खराब गेला. या कालखंडात आपली बर्यापैकी अध्यात्माकडे वाटचाल होणार आहे. तसेच सर्व प्रकारच्या विषयातून अलिप्तता येईल. विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशी जाण्याचे योग आहेत. अविवाहितांचे निर्णय थोडे विलंबाने होतील. नोकरी करणार्यांची बदली घरापासून दूर होईल. थोडेफार आपल्या पाल्याच्या शिक्षणात अडथळे येतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. शेअर्समध्ये फायदा हाईल.

### कन्या – मनावरील दडपण कमी होईल

कोणत्याही कल्पनेत खूप रमणे हा आपला स्थायी भाव. सन २०२४ नंतर अनामिक आपल्यावर दडपण आले किंवा शेजारी-पाजारी, नोकरीतील वरिष्ठ आपल्याशी नीट वागत नव्हते आणि या सर्व गोष्टींची आपल्याला प्रचिती आली असेल. अविवाहितांचे विवाह ठरतील. ठरताना थोडे अडथळे येतील. नोकरी, व्यवसायात विलंबाने यश मिळेल. आपल्या पाल्यांचे उच्च शिक्षणाचे प्रश्न मार्गी लागतील. सुशिक्षित बेरोजगारांना तात्पुरती नोकरी लागेल. शेअर्समध्ये गुंतवणूक करताना जपून निर्णय घ्यावेत. संयम ठेवावा.

### तुळ – नोकरीत प्रमोशन मिळेल

आपला आत्मविश्वास सन २०२४-२५ मध्ये कुठेतरी कमी झाला होता. त्यामुळे नैराश्य प्राप्त झाले होते. परंतू आता मात्र नोकरी, व्यवसायात आपली प्रचंड प्रगती होईल. नोकरीत वरिष्ठ खुष राहतील. अविवाहितांचे विवाह ठरतील. समाजात नवीन ओळखी होतील. प्रतिष्ठा वाढेल. त्यामुळे आता आपण कसलीही चिंता करू नका. तसेच नोकरीच्या निमित्ताने प्रवास भरपूर होतील. लेखक-प्रकाशक यांना हा कालखंड अतिशय उत्कृष्ट जाईल. स्थावर-प्रॉपर्टीचे कामे मार्गी लागतील. चांगल्या ग्रहमानाचा फायदा घ्यावा.

### वृश्चिक – यशदायी कालखंड

जून २०२५ पासून आपली बरीच कामे रखडली आहेत. डिसेंबर २०२५ ते मे २०२६ पासून आपली बरीच कामे अडचणीत होत्या. ग्रहमान पतिकूल होते. परंतू आता मात्र तसे होणार नाही. ग्रहमान प्रचंड अनुकूल झाले आहे. हाती काम घ्याल त्यात यश मिळेल. कोर्ट-कचेरीचे सर्व कामे मार्गी लागतील. अविवाहितांना जोडीदार मनासारखा मिळेल. नवविवाहितांना चांगली बातमी ऐकावयास मिळेल. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळेल. नोकरी, व्यवसायात नवीन कल्पना सुचतील व प्रत्यक्षात उतरतील. अध्यात्मिक क्षेत्रातील एखादी अधिकारी भेटेल व तिच्या मार्गदर्शनाचा लाभ होईल.

### धनु – अडथळ्यांची शर्यत पार पाडावी लागेल

आपल्या महत्वाकांक्षी स्वभावाला या वर्षात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा प्रत्येक पाऊल टाकताना विचार करूनच टाकावे. अन्यथा मनस्ताव होण्याची शक्यता जास्त. नोकरी, व्यवसायात जसे चालले आहे तसे चालू द्यावे. सुशिक्षित बेरोजगारांनी मिळेल ती नोकरी पदरात पाडून घ्यावी. एकंदरीत समाजात व कुटुंबात तुम्हालाच जुळवून घ्यावे लागेल. विद्यार्थ्यांना कष्टाच्या मानाने यश कमी मिळेल. हे सर्व करीत असताना आपल्या आरोक्याकडे लक्ष द्यावे.

### मकर – संतती विषयक सर्व समस्या मिटतील

आपल्या शांत व सोशिक स्वभावाला अत्यंत अनुकूल ग्रहमान आहे. आपल्या संततीच्या जेवढ्या समस्या असतील तेवढ्या त्या मिटतील. अविवाहितांचे विवाह ठरतील. विवाहाच्या संदर्भात निर्णय योग्य ठरतील. सून-जावई येण्याचे योग आहेत. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्यासाठी योग्य काळ आहे. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आरोग्याच्या समस्या उद्भवणार नाहीत. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. नोकरी, व्यवसायात नवीन ओळखी होतील. लेखक-प्रकाशकांना प्रसिद्धीसाठी हा कालखंड अतिशय चांगला आहे. एकंदरीत प्रतिष्ठा वाढणार आहे.

### कुंभ – नोकरी, व्यवसायातील समस्या मिटतील

आपला स्वभाव शांत आणि दूरचा विचार करणारा तसेच तंद्रीत असणे हा आपला दोष. आपल्या नोकरी, व्यवसायातील समस्या मिटतील. नवीन कल्पना सुचतील. जुना एखादा आजार असेल तर योग्य डॉक्टर भेटतील व तो रोग बरा होईल. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळेल. तसेच जुनी येणी वसूल होतील. मात्र हे करताना कुणालाही जामीन राहू नका. शेअर मार्केटमध्ये फायदा आहे. अविवाहितांचे विवाह ठरतील. नवविवाहितांसाठी हा कालखंड एकमेकांशी जुळवून घेण्यासाठी चांगला आहे. एकंदरीत हे वर्ष यशदायी आहे.

### मीन – साडेसातीची तीव्रता कमी होईल

सध्या साडेसाती व सतत द्विधा मनस्थिती तसेच निर्णय घेण्याची क्षमता कमी. परंतू या गुरु पालटामुळे आपल्याला भरपूर अनुकूलता लाभणार आहे. साडेसातीची तीव्रता कमी जाणवेल. संततीच्या सर्व समस्या मिटतील. नोकरी, व्यवसायात इतक्या दिवसात घेतलेल्या कष्टाचे चिज होईल. जीवनात एखादी मागदर्शक व्यक्ती भेटेल व त्या व्यक्तीचे मार्गदर्शन योग्य राहील. शेअर मार्केटमध्ये यश आहे. परंतू अभ्यास करून गुंतवणूक करा. नोकरदार, व्यावसायिकदार यांना कालखंड चांगला. परंतू सर्व अभ्यास करूनच पाऊले टाकावीत. सुशिक्षित बेकारांना नोकरी लागेल.

**✻ मेष-धनु-सिंह या राशींना ४-८-१२ वा गुरु येत असल्याने त्यांनी पुढे दिलेल्या उपासनेपैकी एखादी उपासना करावी म्हणजे त्यांना गुरु बळ मिळण्यास अडचण येणार नाही व थोड्या कष्टाने, प्रयत्नाने प्रगती होईल.**

## अनिष्ट गुरुसाठी उपासना

१) श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचा 'श्री स्वामी समर्थ' या मंत्राचा जप करावा.

२) शेगावचे गजानन महाराज यांच्या गजानन विजय ग्रंथाचे पारायण करावे.

३) श्री टेंभे स्वामी लिखित 'दत्त महात्म' वाचावे. शिर्डीच्या साईबाबांचे स्तवनमंजिरी किंवा साईचरित्र वाचावे.

४) श्री शंकर महाराजांची 'शंकरगीता' या ग्रंथाचे वाचन, पारायण करावे.

५) श्रीदत्त क्षेत्री एखादी यात्रा करावी.

६) पुष्कराज हा नवरत्नापैकी खडा पुनर्वसू किंवा पुष्य या नक्षत्री धारण करावा. गुरु या ग्रहाचा बराचसा अनिष्टपणा कमी होतो असा अनुभव आहे.

७) दर गुरुवारी उपवास करावा.

८) पिंपळ या वृक्षास पाणी घालून त्या वृक्षाला साखरेचा नैवेद्य दाखवावा. असे २८ गुरुवार केल्यास अधिक तीव्रतेने फळ मिळते.

९) आपल्याकडून काटेकोर सोवळे-ओवळे पाळले जाणार असेल तरच गुरुचरित्राचे किंवा नवनाथ पोथीचे पारायण करावे.

१०) आपल्याला अध्यात्मिक दृष्टीकोनातून जे काही करणे शक्य असेल तेच करावे.ओढून-ताणून करू नये. कारण ईश्वर फक्त खऱ्या भक्तीचा भुकेला आहे. त्याला दोन हात व एक मस्तक या व्यतिरिक्त काही लागत नाही.

११) पीडा परिहारकारक दानवस्तू योग्य त्या ठिकाणी अर्पण कराव्यात.

१२) धनू रास किंवा धनू लग्न यांना ८वा गुरु येत असल्यामुळे त्यांनी पुण्यकाळात १९ हजार एवढा गुरुचा जप करावा.

१३) कालखंड प्रतिकूल असल्यामुळे थोडी शांतता व संयम ठेवावा.

१४) आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कोणत्याही गोष्टीचे अवडंबर करू नये. समाजाला दाखविण्यासाठी तर मुळीच करू नये.

१५) दत्तसंप्रदायात खोटेपणा चालत नाही. त्यामुळे आपणच योग्य ती काळजी घ्यावी.

१६) वरिल उपयांपैकी उपाय केल्यास ज्यांना गुरु प्रतिकूल आहे, त्यांना अनुकूल होण्यास मदत होईल व हा पडता काळ सुकर होईल.

**– श्री. संजय कुलकर्णी,**

ज्योतिष विषयक मार्गदर्शन मिळेल.मोबाईल ७५८८०२१६६६

# ३१ मे – जागतिक तंबाखूमुक्ती दिन

## तंबाखू सोडा, जीव वाचवा

दर सहा सेकंदाला जगात एक माणूस तंबाखूमुळे जीव गमावतो. हे वाचताना तुम्हाला कदाचित धक्का बसेल. पण हे कटू सत्य आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार दर वर्षी जगभरात ८० लाखांहून अधिक माणसे तंबाखूमुळे मृत्युमुखी पडतात. यापैकी १३ लाख मृत्यू एकट्या भारतात होतात. म्हणजेच आपल्या देशात दर २४ सेकंदाला एक माणूस तंबाखूमुळे आपला जीव गमावतो.

३१ मे हा दिवस जागतिक तंबाखूमुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने एक कर्करोग शल्यचिकित्सक म्हणून मला अहिल्यानगरच्या माझ्या बांधवांशी मनमोकळेपणाने बोलायचे आहे, कारण मी दररोज माझ्या operation theatre मध्ये जे पाहतो, ते खूप भीतीदायक आहे आणि त्याहून जास्त हृदयद्रावक आहे.

**तंबाखूचे भारतातील वास्तव**

भारतात आज २७ कोटींहून अधिक लोक तंबाखूच्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचे सेवन करतात. गुटखा, खैनी, मावा, तंबाखूची पुडी, बिडी, सिगारेट या सर्व गोष्टी आपल्या समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागात गुटखा आणि पान–सुपारीचे व्यसन मोठ्या प्रमाणावर आढळते.

भारत सरकारने गुटख्यावर बंदी घातली असली तरी प्रत्यक्षात तो सहज उपलब्ध आहे. शाळांच्या बाहेर, बस स्थानकांवर, बाजारपेठांमध्ये सर्वत्र तंबाखूजन्य पदार्थ विक्री होते. आणि सर्वात चिंताजनक बाब म्हणजे १२ ते १५ वर्षांच्या मुलांमध्येही हे व्यसन वाढत आहे.

**तंबाखू कर्करोग कसा करतो?**

तंबाखूमध्ये ८० हून अधिक कर्करोगकारक रसायने असतात (carcinogen). जेव्हा आपण गुटखा चघळतो किंवा धूम्रपान करतो, तेव्हा ही रसायने आपल्या पेशींमधील DNA ला थेट इजा करतात. DNA खराब झाल्यावर पेशी अनियंत्रितपणे वाढू लागतात – हीच कर्करोगाची सुरुवात असते.

महाराष्ट्रात तोंडाचा कर्करोग हा सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. गुटखा आणि पान–सुपारीमुळे होणारा submucous fibrosis म्हणजे तोंड हळूहळू न उघडणे हे precancerous condition चे लक्षण असते. पण दुर्दैवाने बहुतेक रुग्ण याकडे दुर्लक्ष करतात.

माझ्या OPD मध्ये दर आठवड्याला असे रुग्ण येतात ज्यांचे तोंड तीन बोटांपेक्षा जास्त उघडत नाही. तपासणी केल्यावर त्यांना समजते की हे pre-cancer आहे. काहींमध्ये तर कर्करोग आधीच सुरू झालेला असतो. माझ्या operation theatre मधील वास्तव मी गेल्या काही वर्षांत शेकडो तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांवर शस्त्रक्रिया केली आहे. या रुग्णांमध्ये शेतकरी आहेत, कामगार आहेत, शिक्षक आहेत, तरुण बाप आहेत. एक गोष्ट माझ लक्ष सतत वेधून घेते– जवळजवळ सर्व रुग्णांच्या कर्करोगाचे कारण तंबाखू होते.

वयाच्या अवघ्या २५ ते ३५ वर्षांत जबड्याचा किंवा जिभेचा भाग काढावा लागणे हे किती वेदनादायक आहे हे शब्दात सांगणे अशक्य आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण बोलू शकत नाही, नीट खाऊ शकत नाही, आपल्या मुलांशी व्यवस्थित संवाद साधू शकत नाही. OT च्या बाहेर त्यांचे कुटुंब डोळ्यांत पाणी घेऊन वाट पाहत असते आणि हे सगळे टाळता आले असते फक्त तंबाखू सोडली असती तर.

**वेळेत ओळखा – हे पाच इशारे**

तोंडाचा कर्करोग वेळेत आढळला तर ८० ते ९०% रुग्ण पूर्णपणे बरे होतात. म्हणून हे पाच इशारे प्रत्येकाने लक्षात ठेवावेत. तोंडात पांढरा किंवा लाल चट्टा जो स्वतःहून जात नाही, तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ राहणारी जखम, तोंड पूर्ण न उघडणे, गिळताना त्रास होणे आणि मानेत किंवा जबड्याखाली गाठ येणे यांपैकी कोणतेही लक्षण आढळल्यास लगेच डॉक्टरांकडे जावे. एक दिवसाचाही उशीर करू नये.

**उपचार उपलब्ध आहेत – भीती बाळगू नका**

अनेकांना वाटते की कर्करोगाचे निदान झाले म्हणजे सर्व संपले. हे चुकीचे आहे. आज आधुनिक शस्त्रक्रिया, radiation therapy आणि chemotherapy यांच्या माध्यमातून कर्करोगावर मात करणे शक्य आहे. सुरुवातीच्या अवस्थेत फक्त शस्त्रक्रियेनेच रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. आयुष्मान भारत योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कर्करोगाचे उपचार मोफत मिळतात. त्यामुळे आर्थिक परिस्थिती हा अडथळा नाही, उशीर करणे हाच सर्वात मोठा शत्रू आहे.

**तंबाखू सोडणे शक्य आहे**

तंबाखू सोडायची आहे पण जमत नाही असे अनेकजण सांगतात. हे खरे आहे. तंबाखूचे व्यसन हे निकोटीनमुळे होते आणि ते सोडणे सोपे नाही. पण अशक्य नाही. तंबाखूमुक्तीसाठी सरकारी दवाखान्यांमध्ये तंबाखूमुक्ती केंद्रे आहेत. Nicotine replacement therapy उपलब्ध आहे. तज्ज्ञांची मदत घ्या. घरच्यांचा पाठिंबा घ्या आणि सर्वात महत्त्वाचे आजच सुरुवात करा.

**माझी विनंती**

एक कर्करोग शल्यचिकित्सक म्हणून मी अहिल्यानगरच्या माझ्या सर्व बांधवांना एकच विनंती करतो, तंबाखू सोडा, आजच, आत्ताच.

मला तुम्हाला माझ्या ऑपरेशन टेबलवर बघायचे नाही. मला तुम्ही तुमच्या मुलांना मोठे होतांना बघावे असे वाटते. तुमच्या कुटुंबासोबत आनंदाने म्हातारे व्हावे असे वाटते. तंबाखू हे स्वप्न हळूहळू, वेदनेने आणि शांतपणे हिरावून घेतो.

जागतिक तंबाखूमुक्ती दिनानिमित्ताने एकच संकल्प करा. तंबाखू सोडतो, जीव वाचवतो.

**– डॉ. अद्वैत अरुण वैद्य,**
MBBS, M.S. (Gen. Surgery), M.Ch. (Surgical Oncology)
**कॅन्सर सर्जन, अहिल्यानगर, महाराष्ट्र.**

# तंबाखू – तरुण पिढीच्या आरोग्यावर घोंगावणारे अदृश्य संकट

आजच्या आधुनिक जीवनशैलीत तंबाखूचे व्यसन वेगाने वाढत आहे. विशेषतः युवक आणि किशोरवयीन मुलांमध्ये गुटखा, पानमसाला, सिगारेटसारख्या सवयी चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहेत. सुरुवातीला मजा, फॅशन किंवा मित्रांच्या दबावामुळे सुरू होणारे हे सेवन नंतर गंभीर व्यसनात बदलते. या व्यसनामुळे भारतात मुखाचा कर्करोग, हृदयविकार आणि श्वसनविकाराचे प्रमाण वाढत असून सार्वजनिक आरोग्यासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

तंबाखूमधील निकोटीन हे अत्यंत घातक व व्यसनकारक रसायन आहे. निकोटीन मेंदूवर परिणाम करून व्यक्तीला तात्पुरता आनंद आणि आराम मिळाल्याची भावना निर्माण करते. त्यामुळे व्यक्ती पुन्हा, पुन्हा तंबाखू सेवन करू लागते. काही काळानंतर शरीर निकोटीनवर अवलंबून बनते. तंबाखू सोडल्यावर चिडचिड, बेचैनी, चिंता, झोपेचा त्रास आणि मानसिक अस्वस्थता निर्माण होते. त्यामुळे अनेकांना व्यसन सोडणे कठीण जाते.

भारतात मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढण्यामागे चघळण्याच्या तंबाखूचा मोठा वाटा आहे. गुटखा, जर्दा आणि सुपारीमधील रसायने तोंडाच्या पेशींना हानी पोहोचवतात. सुरुवातीला तोंडात पांढरे डाग, जखमा किंवा जिभेवर बदल दिसतात. पुढे तोंड न उघडणे, बोलताना त्रास होणे आणि गिळताना वेदना होणे अशी गंभीर लक्षणे निर्माण होतात. योग्य वेळी उपचार न झाल्यास हा कर्करोग जीवघेणा ठरू शकतो.

धूम्रपानाचे दुष्परिणाम देखील अत्यंत गंभीर आहेत. सिगारेट किंवा बीडीमधील धूर फुफ्फुसांमध्ये जाऊन श्वसनसंस्थेचे नुकसान करतो. सतत खोकला, श्वास घेण्यास त्रास, फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होणे आणि फुफ्फुसांचा कर्करोग यांचा धोका वाढतो. तंबाखूमुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि रक्तदाब वाढतो. परिणामी हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो.

मुखाच्या कर्करोगाची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तोंडात सतत राहणारी जखम, गालाच्या आतील भागात घट्टपणा, गिळताना त्रास, रक्त येणे किंवा आवाज बदलणे ही धोक्याची चिन्हे आहेत. लवकर निदान झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळे नियमित दंत व वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.

राज्य सरकारने गुटखाबंदीचा निर्णय घेतला असला तरी अनेक तरुण मावा किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी गेली आहे. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेच्या अहवालातही याबाबत चिंता व्यक्त केली आहे. सध्या तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांवर ज्यावेळी कौटुंबिक जबाबदारी पडेल किंवा त्यांच्या कर्तबगाराची दिवस येतील त्यावेळी २५ टक्के लोकांना या आजारांशी सामना करावा लागू शकतो. २५ टक्के लोकांना म्हातारपणापर्यंत या आजारांशी झगडावे लागण्याची शक्यता आहे.

तंबाखूविरोधी लढ्यात शासन, शाळा, पालक आणि समाज यांची भूमिका महत्त्वाची आहे. शाळांमध्ये व्यसनमुक्ती शिक्षण, तंबाखू विक्रीवर नियंत्रण आणि जाहिरातींवर कठोर निर्बंध आवश्यक आहेत. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानबंदीचे नियम काटेकोरपणे पाळले गेले पाहिजेत. जागतिक तंबाखूमुक्त दिन हा फक्त एक दिवस नसून आरोग्यदायी जीवनाचा संदेश आहे. वर्षभर यासाठी राबविणे गरजेचे आहे. तंबाखूपासून दूर राहणे म्हणजे स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करणे होय. आरोग्यपूर्ण भारतासाठी प्रत्येकाने तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा आपल्या देशातील मोठी पिढी कर्करोगाच्या विळख्यात सापडण्याची भीती निर्माण झाली आहे.



**– डॉ. सतीश सोनवणे**
अध्यक्ष, तंबाखू नियंत्रण व कर्करोग जनजागृती समिती
राज्य समन्वयक, महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर्स.

# इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेची 'जागतिक तंबाखूमुक्त दिना'निमित्त व्यापक जनजागृती मोहीम

## मौखिक कर्करोग तपासणी शिबिराला प्रतिसाद

नगर – ३१ मे रोजी साजरा करण्यात येणाऱ्या 'जागतिक तंबाखूमुक्त दिना'निमित्त इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेच्या वतीने तंबाखूविरोधी व्यापक जनजागृती मोहीम तसेच मौखिक कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या तंबाखू सेवनामुळे समाजात निर्माण होत असलेल्या गंभीर आरोग्य समस्यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून विविध स्तरातून या मोहिमेचे स्वागत करण्यात येत आहे.






३१ मे रोजी साजरा करण्यात येणाऱ्या 'जागतिक तंबाखूमुक्त दिना'निमित्त इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेच्या वतीने तंबाखूविरोधी व्यापक जनजागृती मोहीम तसेच मौखिक कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये बिडी कामगार,औद्यगिक क्षेत्रातील कामगार, माथाडी कामगार आदींची तपासणी करण्यात आली.

मौखिक कर्करोग तपासणी व तंबाखूमुक्ती जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये तंबाखूचे दुष्परिणाम, व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध उपाययोजना, आरोग्य सल्ला तसेच मौखिक कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये जनजागृती व्हावी यासाठी विविध माध्यमाच्या द्वारे जनजागृती करण्यात येत आहे

इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. ओंकार भालसिंग यांनी तंबाखूचे व्यसन सोडणे हा निरोगी आणि सुरक्षित आयुष्याकडे जाणारा सर्वात महत्त्वाचा निर्णय असल्याचे सांगितले. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनशैलीमध्ये तंबाखू, गुटखा, मावा, पानमसाला, सिगारेट, वेपिंग आणि इतर व्यसनाधीन पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. विशेषतः युवक, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याने सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे केवळ वैयक्तिक आरोग्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबासाठी घातक ठरत आहे. व्यसनामुळे आर्थिक नुकसान, मानसिक तणाव, कौटुंबिक कलह तसेच सामाजिक असुरक्षितता निर्माण होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

तंबाखू सेवनामुळे तोंडाचा, घशाचा आणि फुफ्फुसाचा कर्करोग, हृदयविकार, श्वसनाचे आजार, रक्तदाब, दात व हिरड्यांचे गंभीर विकार यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचा धोका वाढत असल्याचे दंततज्ज्ञांनी स्पष्ट केले. विशेषतः गुटखा आणि माव्याच्या सतत सेवनामुळे तोंडातील पेशींमध्ये होणारे बदल पुढे जाऊन मौखिक कर्करोगाला कारणीभूत ठरत असल्याचे सांगण्यात आले.

जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार दरवर्षी जगभरात लाखो लोकांचा मृत्यू तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होत आहे. भारतामध्ये तोंडाचा कर्करोग हा सर्वाधिक आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक असून त्यामागील प्रमुख कारण तंबाखूचे सेवन असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

भारतामध्ये सुमारे ३० टक्के कर्करोग हे तोंडाशी संबंधित असून तोंडाच्या कर्करोगाच्या जवळपास ८० टक्के रुग्णांमध्ये तंबाखू सेवन हे मुख्य कारण असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. ग्रामीण भागात तसेच कामगार वर्गामध्ये गुटखा, तंबाखू आणि सुपारी सेवनाचे प्रमाण अधिक असल्याने आरोग्य धोक्यात येत असल्याची बाबही पुढे आली आहे.

तंबाखू, गुटखा किंवा सुपारीच्या सातत्याने सेवनामुळे तोंडातील आतील त्वचेवर परिणाम होऊन पेशींमध्ये असामान्य बदल होतात. तोंडात न भरणारी जखम, लाल किंवा पांढरे चट्टे, जिभेला जळजळ, तोंड उघडण्यास त्रास, गिळताना अडचण, मानेमध्ये गाठ निर्माण होणे ही मौखिक कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. ही लक्षणे दिसताच तत्काळ तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

वेळेवर निदान झाल्यास तोंडाच्या कर्करोगावर प्रभावी उपचार करणे शक्य होते. त्यामुळे नियमित दंत तपासणी आणि तोंडाची वैद्यकीय तपासणी याकडे दुर्लक्ष करू नये, असेही यावेळी सांगण्यात आले. विशेषतः व्यसनाधीन व्यक्तींनी नियमित तपासणी करून आरोग्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन करण्यात आले.

इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेच्या वतीने यावर्षी विशेष उपक्रम म्हणून बीडी कामगार तसेच एमआयडीसी परिसरातील कामगारांसाठी, माथाडी कामगार यांची संस्थेच्या सचिव डॉ. शिल्पा इनमुलवार यांनी युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती वाढविण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. नियमित तोंड तपासणीमुळे कर्करोगाची लवकर ओळख होऊन जीवितहानी टाळता येऊ शकते, असे त्या म्हणाल्या.

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्। व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा।। या सुभाषिताचा उल्लेख करत व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश देण्यात आला. व्यसनामुळे व्यक्तीच्या आयुष्याचा ऱ्हास होतो, तर निरोगी जीवनशैलीमुळे समाज अधिक सक्षम बनतो, असा संदेश या मोहिमेतून देण्यात येत आहे.

तंबाखूमुक्त आणि निरोगी समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. युवक, पालक, शिक्षक आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन तंबाखूविरोधी लढा उभारण्याची गरजही यावेळी अधोरेखित करण्यात आली. या जनजागृती मोहिमेसाठी इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे तसेच अहिल्यानगर जिल्हा दंत वैद्यकीय शाखेच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांना कायमचा नकार देऊन व्यसनमुक्त आणि निरोगी समाज घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन शेवटी करण्यात आले

# करण कोठारी ज्वेलर्सच्या दागिने प्रदर्शनाचा शुभारंभ

## आकर्षक सोने–हिऱ्यांचे कलेक्शन व विशेष ऑफर्समुळे ग्राहकांची गर्दी

नगर – नागपूरमधील विश्वासार्ह आणि नामांकित ज्वेलरी ब्रँड करण कोठारी ज्वेलर्सतर्फे अहिल्यानगरमध्ये तिसऱ्यांदा आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय दागिने प्रदर्शनाचा शुक्रवारी शुभारंभ करण्यात आला. महापौर ज्योतीताई गाडे, भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा गीता गिल्डा, जिजामाता सोशल योगा ग्रुपच्या मनीषा गुगळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी प्रदर्शनातील दागिन्यांच्या उत्कृष्ट कारागिरीचे कौतुक करत ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. स्टेशन रोड, आनंदऋषीजी हॉस्पिटलसमोरील हॉटेल आयरीस प्रिमिअर येथे ३१ मे पर्यंत सकाळी १० नंतर हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे.

पिढ्यानपिढ्या जपलेला विश्वास, शुद्धता आणि उत्कृष्ट कारागिरी यासाठी ओळख असलेल्या करण कोठारी ज्वेलर्सकडून अहिल्यानगरकरांसाठी खास सोने व हिऱ्यांचे आकर्षक कलेक्शन सादर करण्यात आले आहे.



करण कोठारी ज्वेलर्सतर्फे अहिल्यानगरमध्ये तिसऱ्यांदा आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय दागिने प्रदर्शनाचा दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना महापौर ज्योतीताई गाडे, भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा गीता गिल्डा, जिजामाता सोशल योगा ग्रुपच्या मनीषा गुगळे.

येथील सर्व सोन्याचे दागिने १००% हॉलमार्क (एचयुआयडी) प्रमाणित असून हिऱ्यांचे दागिने जीआयए प्रमाणित आहेत. त्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट डिझाईन्ससोबत शुद्धतेची पूर्ण खात्री मिळते.

लग्नासाठी खास ब्रायडल कलेक्शन, एक्सक्लुझिव्ह डायमंड ज्वेलरी, पारंपरिक व राजेशाही डिझाईनची टेम्पल व अँटीक ज्वेलरी, दैनंदिन वापरासाठी लाईटवेट डेली वेअर दागिने, राजेशाही थाट असलेले पोल्की, कुंदन आणि जडाऊ याठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रदर्शना निमित्त डायमंड ज्वेलरीच्या मेकिंग चार्जेसवर १०० टक्के पर्यंत सूट, सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३० टक्के पर्यंत सूट देण्यात येत आहे.

करण कोठारी ज्वेलर्सची सेवा नागपूर (४ प्रमुख शोरूम्स), अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर अशा एकूण ७ ठिकाणी उपलब्ध असून आता हा विश्वासार्ह ब्रँड प्रदर्शनाद्वारे अहिल्यानगरमध्ये ग्राहकांच्या भेटीस आला आहे.

या विशेष प्रदर्शनाला भेट देऊन दागिन्यांचा अविस्मरणीय अनुभव घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्राचीन शिवाचा मारुती मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी तरुणांचा पुढाकार

निंबळक – अहिल्यानगर जिल्ह्यातील इसळक व निंबळक गावच्या शीव हद्दीत असलेल्या प्राचीन मारुती मंदिराच्या जीर्णोधारासाठी परिसरातील तरुणांनी पुढाकार घेतला असून या कामात ग्रामस्थ व भाविकांकडून प्रतिसाद मिळत आहे. श्रमदान आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून मंदिराचे काम वेगाने सुरू आहे.



इंजिनिअर मयूर खुंटाळे यांनी मंदिराची झालेली दुरावस्था लक्षात आणून देत समविचारी मित्र आणि मारुती भक्तांसमोर जीर्णोधाराचा प्रस्ताव मांडला. या उपक्रमाला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रत्यक्ष कामालाही सुरुवात केली. परिसरातील ग्रामस्थ आणि भाविकांच्या सहकार्यामुळे पुढील दोन महिन्यांत मंदिराचे काम पूर्णत्वास जाईल, असा विश्वास ज्ञानेश्वर डहाळे यांनी व्यक्त केला. तसेच मंदिराच्या कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन अंकुश लोंढे, बापुराव कोतकर, प्रकाश तांबे आणि दत्ता मते यांनी केले आहे.

# 'आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील ब्लड बँकेत' १ जूनपासून दररोज सूक्ष्म व्यायाम पध्दती उपचार मार्गदर्शन उपलब्ध

## कंबरदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, खांदेदुखीवर विनाऔषध परिणामकारक उपचार

नगर – विविध कारणांमुळे अनेकांना पाठीचे, मणक्यांचे विकार जडत असतात. अशा मणके विकारांवर राष्ट्रसंत आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील आनंदऋषीजी ब्लड बँकेत सूक्ष्म व्यायाम पद्धतीव्दारे मोफत उपचारांची कायमस्वरुपी व्यवस्था कार्यान्वीत आहे. याठिकाणी आता १ जून पासून दररोज सकाळी ९ ते १० यावेळेत सूक्ष्म व्यायाम पध्दती उपचार मार्गदर्शन केले जाणार आहे. आतापर्यंत ७०० हून अधिक रूग्णांना या उपचारांनी आराम मिळाला आहे.

मणक्यात गॅप पडणे, गादी सरकणे, नियमित पाठ व कंबर दुखी, पूर्ण पाय दुखणे, हातापाय बधिर होणे, मान अवघडणे, हातापायात मुंग्या येणे अशी लक्षणे आढळणाऱ्या रूग्णांना सूक्ष्म व्यायाम करून चांगला आराम मिळू शकतो. सतत एका जागेवर बसून राहणे, संगणकाचा अति वापर, जास्त वेळ एका जागी उभे राहणे, पोटावर जास्त वजन असणे अशा अनेक कारणांमुळे मणके विकार उद्भवतात. सूक्ष्म व्यायाम उपचार पध्दतीत व्यायामात नेमकेपणा असतो. कंबरदुखी, पाठदुखी, मानेचे दुखणे, गुडघेदुखी आदी विकारांनी त्रस्त रूग्णांना व्यायामाच्या साध्यासोप्या आणि तितक्याच परिणामकारक पध्दती शिकवल्या जातात. यातून रूग्णांना हमखास गुण येत असतो.

अधिक माहितीसाठी संपर्क: ९४२३४३२७५९/९९२१२७२३०६.

# अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप २०२५–२६ फुटबॉल लीगचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

## फिरोदिया शिवाजियन्स, बाटा, सुमन एंटरप्रायझेस व गुलमोहर फुटबॉल क्लब सुपर लीगसाठी पात्र; ३० जूनपासून सुरू होणार सुपर लीग

नगर – अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप २०२५–२६ चा लीग टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला. जिल्ह्यातील एकूण १२ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. अहमदनगर क्लब शेजारील भुईकोट किल्ला मैदान येथे १८ दिवस चाललेल्या या स्पर्धेत एकूण ३६ सामने खेळविण्यात आले. सर्व संघांनी उत्कृष्ट खेळभावना आणि स्पर्धात्मक फुटबॉलचे दर्शन घडविले.

लीग फेरीअंती पुढील संघांनी सुपर लीगसाठी पात्रता मिळविली.

पूल A फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब, पूल B सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब, गुलमोहर फुटबॉल क्लब

सुपर लीग सामने ३० जून पासून सुरू होणार असून, २ जुलै रोजी होणारा अंतिम सुपर लीग सामना अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप विजेता निश्चित करणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन सर्व सहभागी संघ खेळाडू प्रशिक्षक फुटबॉलप्रेमी यांचे आभार मानले आहे. स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल संयुक्त सचिव व्हिक्टर जोसेफ व कार्यकारिणी सदस्य झेवियर स्वामी तसेच अभय साळवे, अभिषेक सोनवणे, सचिन पात्रे, वैभव मनोदिया आणि राजेश अँथनी यांचे असोसिएशनतर्फे विशेष कौतुक करण्यात आले.

स्पर्धेतील सर्व सामने यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल फुटबॉल असोसिएशन रेफरी पॅनेलचेही विशेष आभार मानण्यात आले. या पॅनेलमध्ये जॉय जोसेफ, प्रकाश कनोजिया, वैभव मनोदिया, शशांक वाल्मिकी, अक्षय बोराडे, रितेश रणमाळे, महेश पाटेकर, अभिषेक सोनवणे, अभय साळवे, जॉय शेळके, सुमित कुमारसिंह, भूषण गवळी, प्रियंका अवारे, सोनिया दोसानी, पूजा भिंगारदिवे, आणि मनीष कुमार सिंह यांचा समावेश होता. अहिल्यानगरमधील फुटबॉलप्रेमींनी सुपर लीगच्या रोमांचक सामन्यांना उपस्थित राहावे असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

सुपर लीग वेळापत्रक पुढीलप्रमाणे :–३० जून फिरोदिया शिवाजियन्स FC विरुद्ध गुलमोहर FC सायं.४, सुमन FC विरुद्ध बाटा FC सायं. ५.२०.,

१ जुलै सुमन FC विरुद्ध गुलमोहर FC सायं. ४, फिरोदिया शिवाजियन्स FC विरुद्ध बाटा FC सायं. ५.२०.,

२ जुलै बाटा FC विरुद्ध गुलमोहर FC सायं. ४, फिरोदिया शिवाजियन्स FC विरुद्ध सुमन FC सायं. ५.२०.

सर्व सामने वेळेवर सुरू होतील. लीग टप्प्यातील सर्व पिवळी कार्डे रद्द करण्यात आली असून, ती पुढे ग्राह्य धरली जाणार नाहीत. सर्व संघांनी शिस्तीचे काटेकोर पालन करण्याचे सांगण्यात आले आहे. सामन्यांचा कालावधी ४०–७–४० असा राहणार आहे.




# उन्हाळ्यातही मलेरियाचा धोका

आरोग्यमंत्र
डॉ. कुंदन गायकवाड

पूर्वी मलेरिया हा प्रामुख्याने पावसाळ्यात होणारा आजार मानला जात होता; मात्र आता परिस्थिती बदलत आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये उन्हाळ्यातही मलेरियाचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. पावसाळ्याइतके प्रमाण नसले, तरी ही वाढ चिंताजनक असून बदलत्या ट्रेंडकडे निर्देश करते.

पर्यावरणातील बदल, जैविक अनुकूलता आणि झपाट्याने होणारे शहरीकरण ही प्रमुख कारणे आहेत. तापमानातील वाढ हे यामागील महत्त्वाचे कारण आहे. वाढत्या उष्णतेमुळे मलेरियाचे ॲनोफिलीस डास आता गरम हवामानातही टिकून राहू शकतात. पूर्वी उष्ण तापमान त्यांच्या वाढीस मर्यादा घालते, असे मानले जात होते; मात्र आता हे दोन्ही घटक त्या परिस्थितीशी जुळवून घेत आहेत. शहरांमधील 'अर्बन हीट आयलंड' हा देखील एक महत्त्वाचा घटक आहे. मुंबईसारख्या दाट वस्तीच्या शहरांमध्ये कॉंक्रीटचे प्रमाण जास्त असल्यामुळे उष्णता साठून राहते आणि स्थानिक पातळीवर उष्ण वातावरण तयार होते.


पाण्याच्या साठवण करण्याच्या पद्धतीदेखील महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक घरांमध्ये पाणी ड्रम, टाक्या किंवा इतर उघड्या भांड्यांमध्ये साठवले जाते. ही ठिकाणे डासांच्या प्रजननासाठी आदर्श ठरतात. याशिवाय बांधकामस्थळे, टेरेस आणि मोकळ्या जागांमध्ये साचलेले पाणीही डासांची पैदास वाढवते. परिणामी मलेरियाचा धोका वाढतो. डास नियंत्रणाच्या उपाययोजनांमध्ये असलेली कमतरता हीदेखील एक गंभीर समस्या आहे. परंपरेने डास नियंत्रणावर अधिक भर पावसाळ्यात दिला जातो; मात्र आता मलेरिया वर्षभर आढळत असल्याने केवळ हंगामी उपाय पुरेसे ठरत नाहीत. यासाठी वर्षभर सातत्याने नियंत्रण उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

**स्थलांतर हा महत्त्वाचा घटक**

शहरांमध्ये मलेरिया जास्त प्रमाणात असलेल्या भागांमधून लोक येतात. अशा व्यक्तींमुळे संक्रमण शहरांमध्ये येऊ शकते आणि स्थानिक डासांद्वारे ते पुढे पसरू शकते. त्यामुळे ऑफ-सीझनमध्येही मलेरिया टिकून राहतो. याशिवाय, कीटकनाशकांविरुद्ध डासांमध्ये वाढत असलेला प्रतिकारही चिंतेचा विषय आहे. काही भागांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांविरुद्ध डासांनी प्रतिकार विकसित केला आहे. स्थलांतरामुळे हे प्रतिरोधक प्रकार शहरांमध्येही येत आहेत. त्यामुळे नियंत्रण अधिक कठीण होते.

**प्रतिबंधात्मक उपाय**

या समस्येवर काही प्रतिबंधात्मक उपाय आवश्यक आहेत. घराजवळ पाणी साचू देऊ नये आणि पाण्याच्या टाक्या व भांडी झाकून ठेवावीत. यामुळे डासांची पैदास कमी होऊ शकते. तसेच, धोरणात्मक पातळीवर वर्षभर सातत्याने डास नियंत्रण कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. वैयक्तिक पातळीवरही संरक्षण महत्त्वाचे आहे. बाहेर जाताना पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करावेत आणि त्वचा उघडी राहणार नाही याची काळजी घ्यावी.



# हंटा व्हायरसची जगाला भीती का?

जाणून घ्या
डॉ. महेश दळे

लजागतिक आरोग्य संघटना आणि दक्षिण आफ्रिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अटलांटिक महासागरातील एका क्रूझ शिपवर हंटा व्हायरस संसर्गाच्या संशयित प्रादुर्भावामुळे तीन जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एका वृद्ध विवाहित जोडप्याचा समावेश आहे. किमान इतर तीन जणही आजारी पडले आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, एक रुग्ण दक्षिण आफ्रिकेतील एका रुग्णालयात अतिदक्षता विभागात आहे आणि लक्षणे असलेल्या इतर दोन प्रवाशांना जहाजावरून बाहेर काढण्यासाठी ही संस्था अधिकाऱ्यांसोबत काम करत आहे. हंटा व्हायरस जगभर आढळतो. उंदीर व खारींच्या मूत्र किंवा विष्ठेच्या संपर्कातून पसरतो. गेल्या वर्षी हॉलिवूड अभिनेता जीन हॅकमन यांची पत्नी बेट्सी अराकावा यांचा न्यू मेक्सिकोमध्ये या संसर्गामुळे मृत्यू झाला तेव्हा हा विषाणू लोकांच्या नजरेत आला होता.

'एमव्ही होंडियस' या डच क्रूझ शिपवर हंटा व्हायरसचा प्रादुर्भाव झाला आहे. नेदरलँड्स-स्थित 'ओशनवाइड एक्स्पिडिशन्स'ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे, की त्यांच्या एमव्ही होंडियस या ध्रुवीय मोहीम जहाजावर एका गंभीर वैद्यकीय परिस्थितीवर काम सुरू आहे. हे जहाज सध्या आफ्रिकेच्या पश्चिमेला अटलांटिक महासागरात वसलेल्या केप वर्दे या बेट राष्ट्राजवळ आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, ही मोहीम सुमारे तीन आठवड्यांपूर्वी अर्जेंटिनामधून अंदाजे दीडशे प्रवाशांना घेऊन निघाली होती. केप वर्देच्या मार्गावर, ते अंटार्क्टिका आणि इतर ठिकाणी थांबले होते.



डच परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने दोन डच प्रवाशांच्या मृत्यूची पुष्टी केली; परंतु अधिक तपशील दिला नाही. जागतिक आरोग्य संघटनेने 'एक्स' वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे, की आजारी प्रवाशांपैकी एक दक्षिण आफ्रिकेतील अतिदक्षता विभागात आहे. तो प्रवासी ब्रिटिश नागरिक आहे. केप वर्देच्या अधिकाऱ्यांनी वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या प्रवाशांना जहाजातून उतरण्याची परवानगी दिली नाही. डच अधिकारी दोन आजारी प्रवासी आणि एका मृत प्रवाशाचा मृतदेह मायदेशी परत आणण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करत आहेत.



# ...म्हणून प्रतिजैविकांचा परिणाम शून्य

आरोग्यचर्चा
डॉ. अजेय गर्जे

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटीबायोटिक्स घेत असाल तर काळजी घ्या कारण प्रतिजैविक प्रतिरोधकतेमुळे जगभरात ३० लाखाहून अधिक मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. व्हिएन्ना येथे सादर केलेल्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे. दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या प्रतिजैविकांच्या वापरावरही या संशोधनाने चिंता व्यक्त केली आहे.

२०१९ ते २०२१ दरम्यान दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेत प्रतिजैविकांचा वापर झपाट्याने वाढल्याचे सदर संशोधनात म्हटले आहे. या काळात दक्षिण पूर्व आशियामध्ये १६० टक्के तर आफ्रिकेत १२६ टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे राखीव प्रतिजैविकांचा वापर दक्षिण पूर्व आशियामध्ये ४५ टक्के आणि आफ्रिकेत १२५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रतिजैविकांचा हा वाढता वापर गंभीर चिंतेची बाब आहे. लोक स्वेच्छेने अँटिबायोटिक्स घेत आहेत. त्यामुळे अँटी-मायक्रोबियल रेझिस्टन्सही झपाट्याने वाढत आहे.


प्रतिजैविक प्रतिकार म्हणजे काय?

कोणत्याही रोगास कारणीभूत असणारे जीवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिजैविकांना प्रतिकार करण्याची क्षमता विकसित करतात. परिणामस्वरुप त्या जिवाणू वा विषाणूने संक्रमित रुग्णावर उपचार करणे अत्यंत कठीण होते. यामुळे जगभरात ३० लाखांहून अधिक मुलांचा मृत्यू झाला असल्याचे ही जागतिक आकडेवारी सांगते. असे असले तरी हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औषधांचा विकास संथ गतीने होत आहे. त्यामुळेच दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये परिस्थिती अशीच राहिली तर परिणाम अत्यंत भीषण होऊ शकतात.

सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक्स टाळा

संशोधनात म्हटले आहे की, राखीव प्रतिजैविके उपचारांच्या पहिल्या टप्प्यासाठी नाहीत. ही औषधे फक्त आणीबाणीसाठी ठेवावीत. स्वतः मनाने अँटिबायोटिक्स घेतात त्यांनी ही सवय त्वरित सोडली पाहिजे. प्रतिजैविक घेण्याचे काही नियम आहेत. ते पाळले नाहीत तर रुग्णाच्या शरीरातील जिवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिरोधक क्षमता विकसित करतात. अशा परिस्थितीत भविष्यात रुग्णाला असाच आजार झाला तर उपचार करणे कठीण होते.

प्रतिजैविक गोळ्या खाल्याने पोटात दुखणे, उलटी आणि अतिसार यांचा समावेश आहे. त्यामुळे भविष्यात संसर्गावर उपचार करणे कठीण होऊ शकते.




# वडिलांच्या धूम्रपानाचे मुलांवर परिणाम

व्याधी विचार
डॉ. प्रसन्न नेने

आधूम्रपान आरोग्यासाठी धोकादायक मानले जाते. याचा परिणाम धूम्रपान करणारा आणि ज्या व्यक्तीसमोर धूम्रपान केले जाते, त्या दोघांच्या आरोग्यावर होतो; परंतु आता एका नवीन अभ्यासातून असे समोर आले आहे, की वडिलांच्या धूम्रपान करण्याच्या सवयीचा परिणाम केवळ त्यांच्या आरोग्यावरच नाही, तर मुलांच्या आरोग्यावरही होऊ शकतो.

संशोधनानुसार, वडील धूम्रपान करीत असतील, तर त्यांच्या मुलामध्ये अनेक आजारांचा धोका वाढू शकतो. कॅलिफोर्निया विद्यापीठातील डॉक्टरांनी हे संशोधन केले आहे. हे 'जर्नल ऑफ द एंडोक्राइन सोसायटी'मध्ये प्रकाशित झाले आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे, की वडील धूम्रपान करत असतील तर त्यांच्या मुलांना टाइप २ मधुमेह ते यकृत रोग आणि अनेक प्रकारच्या चयापचय रोगांचा धोका असतो. संशोधनात असे दिसून आले आहे, की धूम्रपान करणाऱ्या पुरुषांच्या शुक्राणूंमध्ये बदल होऊ शकतो. हे बदल साखर चयापचय आणि जन्माला आलेल्या बाळाच्या शरीरात मधुमेहावरील औषधांच्या कार्य करण्याच्या पद्धतीवर परिणाम करू शकतात. त्यामुळे मुलामध्ये मधुमेहाचा धोका वाढतो.

या संशोधनात एक हजार पुरुषांचा समावेश होता. हे लोक धूम्रपान करणारे होते. तेथे असलेल्या मुलांपैकी तीस टक्के मुलांना मधुमेह आणि यकृताशी संबंधित समस्यांची लक्षणे होती. सुरुवातीच्या निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे, की धूम्रपान मुलांवरही परिणाम करीत आहे. सिगारेट पिणे ही एक अतिशय घातक सवय आहे. ती शरीराच्या जवळजवळ प्रत्येक अवयवावर वाईट परिणाम करते. सिगारेटमध्ये निकोटीन, टार आणि इतर अनेक विषारी रसायने असतात. ही रसायने हळूहळू शरीराला हानी पोहोचवतात. सिगारेटचा सर्वात मोठा परिणाम फुफ्फुसांवर होतो. धूम्रपान केल्यामुळे फुफ्फुसांमध्ये घाण साचते आणि श्वसनमार्गांना सूज येते. त्यामुळे खोकला, दम लागणे आणि श्वास घेण्यास त्रास होतो.



दीर्घकाळ धूम्रपान केल्यास यकृताचा कर्करोग आणि 'क्रॉनिक ऑबस्ट्रक्टिव्ह पल्मनरी डिसीज' सारखे गंभीर आजार होऊ शकतात. सिगारेटचा हृदयावरही मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. धूम्रपानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि रक्तदाब वाढतो. त्यामुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. हृदयाला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता वाढते. सिगारेटमुळे रक्ताभिसरणावर परिणाम होतो. रक्तामधील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते आणि शरीराच्या विविध भागांना पुरेसा रक्तपुरवठा होत नाही. यामुळे थकवा, अशक्तपणा आणि त्वचेवरही वाईट परिणाम दिसू शकतो. तोंड आणि दातांवरही सिगारेटचा वाईट परिणाम होतो.

# पोटावर झोपणे टाळा

दिवसभर दमछाक झाल्यानंतर घरी आल्यावर बिछान्यात पडून लोळावंसं वाटतं. आपण अक्षरश: आडवे पडतो. कसेही झोपतो. पण यामुळे पाठीच्या कण्याला त्रास होऊन पाठीचं किंवा मानेचं दुखणं उद्भवू शकतं. त्यामुळे आपल्या शारीरिक स्थितीकडे नेहमी लक्ष द्यायला हवं. आपण वेगवेगळ्या स्थितीत झोपतो. याचा परिणाम झोपेवरही होऊ शकतो. मात्र एका ठराविक स्थितीत झोपू नये, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अनेक जण पोटावर झोपतात. पण असं झोपणं त्रासदायक ठरू शकतं. पोटावर झोपून पुस्तक वाचणं, मोबाईल, लॅपटॉपचा वापर करणं किंवा फक्त झोपणंही पाठ आणि पोटाच्या आरोग्यासाठी घातक आहे.

मध्यंतरी कॉलेजमधल्या मुलांच्या झोपण्याच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. जवळपास १५ टक्के मुलं पोटावर झोपून लॅपटॉप, मोबाईलचा वापर करत असल्याची बाब यातून समोर आली आहे. पोटावर झोपल्यामुळे पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक बाकात बदल होऊन पाठ आणि मानेची दुखणी उद्भवू शकतात. इतकंच नाही तर सतत पोटावर झोपल्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येऊन बराच त्रास होऊ शकतो. पोटावर झोपून मोबाईल/लॅपटॉपचा वापर करणाऱ्यांना पाठीची दुखणी त्रास देऊ शकतात, असंही एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे अशा स्थितीत झोपणं टाळायला हवं.

# कर्करोगाचा मेंदूवरही परिणाम

आरोग्य जपा
डॉ. सतीश सोनवणे

कर्करोगाचे निदान होताच बहुतेक लोक त्याच्याशी लढण्याचे धैर्य गमावतात. मात्र चौथ्या टप्प्यातही या आजारावर उपचार करणे शक्य असते, हे लक्षात घ्यायला हवे.


एका संशोधनात समोर आले आहे की, कर्करोग शरीराच्या प्रभावित भागावरच नाही तर मेंदूवरही हल्ला करतो. 'सायन्स मेगॅझिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात कर्करोगाचा मेंदू आणि मज्जासंस्थेवर कसा परिणाम होतो हे सविस्तर सांगितले आहे. परिणाम शोधण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आले. सदर संशोधनातून आश्चर्यकारक निष्कर्ष समोर आले. कर्करोगाचा टप्पा वाढत जातो तसतसा हा आजार रुग्णाच्या मनाशी खेळू लागतो, असे या अभ्यासातून समजले.

कर्करोग काय करतो?

हा आजार रुग्णाची इच्छाशक्ती आणि जगण्याची प्रेरणाच नष्ट करतो. त्यामुळे उपचार आणि योग्य पोषण असूनही रुग्ण अशक्त होतो. त्याची प्रकृती बिघडते. उंदरांवर केलेल्या संशोधनातून दिसून आले आहे की, कर्करोग मेंदूच्या विशिष्ट भागातील मज्जासंस्थेवर वाईट परिणाम करतो. या संशोधनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि उपकरणे वापरण्यात आली. ही उपकरणे संपूर्ण मेंदूची प्रतिमा बनवू शकतात आणि मेंदूतील सूक्ष्म हालचालींचेही अचूक निरीक्षण करू शकतात.

संशोधनात काय?

संशोधनात आढळल्यानुसार कर्करोग वाढत गेला तसतसे उंदरांनी अन्न मिळवण्याचे प्रयत्न कमी केले. अवघड कामे पूर्णपणे बंद झाली. मज्जासंस्थेद्वारे मेंदूमध्ये तयार होणाऱ्या डोपामाइन या रसायनाची पातळीही कमी झाल्याचे संशोधनातून समोर आले आहे. हे रसायन प्रेरणा स्त्रोत असून ते एखाद्या व्यक्तीमध्ये इच्छाशक्ती जागृत करते. कर्करोगाच्या चौथ्या टप्प्यातील उपचारादरम्यान रुग्ण जगण्याची आशा गमावून बसतो, असे या संशोधनातून समोर आले आहे. म्हणूनच उपचार योग्य दिशेने सुरू असतानाही तो प्रतिसाद देत नाही आणि मृत्यू स्वीकारतो. सुरुवातीला ही प्रदीर्घ आजारामुळे झालेली मानसिक स्थिती मानली जात होती. परंतु संशोधनानंतर स्पष्ट झाले की कर्करोग शरीरावरच नव्हे तर मनावरही हल्ला करतो आणि रुग्णाची जगण्याची इच्छाच नष्ट करतो.



नवसंशोधन

## भारतीयांचा मेंदू लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार के ला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते. या प्रस्तावावर काम करणाऱ्या सेंटर फॉर व्हयुजअल इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयंत सिवास्वामी यांच्या मते, मेंदूशी संबंधित आजार शोधण्यासाठी मॉन्ट्रियल न्यूरॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (MNI) टेम्पलेटचा उपयोग केला जातो.




दंतारोग्य

## दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. डागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.

केळ्याच्या सालीमध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशियलम, मॅग्नेशियम असते. या गोष्टीचा उपयोग ब्लिचिंग एजंट म्हणून करण्यात येऊ शकतो. त्यामुळे केळ्याचे साल दातांवर घाऊसू शकता.




डोळ्यांचे आरोग्य

## डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावे. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा. स्क्रीन टाईम मर्यादित करा आणि मध्ये ब्रेक घ्या. अश्रू निर्माण करण्यासाठी चांगले हायड्रेटेड वापरा.

वाचताना किंवा डिजिटल उपकरणे वापरताना योग्य प्रकाशयोजना सुनिश्चित करा. उन्हाळ्यात योग्य सनग्लासेस वापरा.



आजीबाईचा बटवा

## शिळी पोळी आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते. या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये. पचनक्रियेसाठी शिळी पोळी खूप फायदेशीर आहे. गॅस, पोट फुगणे या पोटाशी संबंधित समस्यांवर रामबाण उपाय आहे.



# ‘ऑपरेशन सिंदूर’ हे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारातील युद्धनीतीचा आधुनिक आविष्कार

### मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांचे प्रतिपादन; विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचा उत्साहात समारोप

नगर – स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर राष्ट्ररक्षण, विज्ञाननिष्ठता आणि भारताच्या आधुनिक युद्धनीतीचा दूरदृष्टीने विचार करणारे युगपुरुष व ‘धुरंधर’ व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी मांडलेले ‘राजकारणाचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण’ हे विचार आजच्या सशक्त आणि शस्त्रसज्ज भारताच्या रूपाने प्रत्यक्षात साकार होत आहेत. भारताने अलीकडे यशस्वीरित्या पार पडलेले ‘ऑपरेशन सिंदूर’ हे सावरकरांनी त्याकाळी मांडलेल्या युद्धनीतीचा आधुनिक आविष्कार आहे. या यशस्वी मोहिमेद्वारे भारताने जागतिक स्तरावर आधुनिक युद्धाचे नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत, असे प्रतिपादन निवृत्त मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांनी केले.



विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचा समारोप निवृत्त मेजर मोहिनी गर्गे- कुलकर्णी यांच्या व्याख्यानाने झाला. यावेळी महापौर ज्योती गाडे, उद्योजक अश्विन गांधी, रा.स्व.संघाचे माजी जिल्हा संघचालक डॉ. रवींद्र साताळकर, जनजाती कल्याण आश्रमचे महेंद्र जाखेटे व विशारद पेटकर, दिनकर घोडके, अशोकराव गायकवाड, भावना लांडगे आदी उपस्थित होते.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचा समारोप मेजर गर्गे-कुलकर्णी यांच्या ‘सावरकरांच्या स्वप्नातील शस्त्रसिद्ध भारत’ या विषयावरील व्याख्यानाने झाला. सभागृहात उपस्थित श्रोत्यांनी भारताच्या आधुनिक युद्धनीतीचा थरारक व रोमांचकारी अनुभव घेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महान कार्य व योगदान समजून घेतले. मेजर गर्गे यांनी ओघवत्या शैलीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा व कार्याचा जागर करत त्यांनी त्याकाळी मांडलेली युद्धनीती आज कशी प्रत्यक्षात येत आहे याचे उदाहरणांसह सविस्तर विवेचन केले. असे महान व्यक्तिमत्व आपल्या भूमीत जन्माला आले हे आपले सौभाग्य आहे; पण आपण त्यांना समजून घेतले नाही, हे आपले दुर्दैव आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

व्याख्यानमालेच्या समारोपास प्रमुख पाहुणे महापौर ज्योती गाडे, उद्योजक अश्विन गांधी, रा.स्व. संघाचे माजी जिल्हा संघचालक डॉ. रवींद्र साताळकर, जनजाती कल्याण आश्रमचे प्रांत पदाधिकारी महेंद्र जाखेटे व विशारद पेटकर, माऊली सभागृहाचे चेअरमन दिनकर घोडके, व्याख्यानमालेचे सहप्रमुख अशोकराव गायकवाड, सौ.भावना लांडगे आदींसह नगरसेवक, विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

ऑपरेशन सिंदूर व आधुनिक शस्त्रसिद्ध भारत यावर बोलताना मेजर मोहिनी गर्गे- कुलकर्णी पुढे म्हणाल्या, युद्ध कधी, कसे लढायचे आणि योग्य वेळी कोठे थांबायचे?, याचा नवा आदर्श भारताने जगासमोर ठेवला आहे. हे ऑपरेशन केवळ मर्यादित लष्करी कारवाई नसून, दहशतवादा विरोधातील निर्णायक संघर्षाची नांदी आहे. आजपर्यंत झालेल्या प्रत्येक युद्धात भारताने पाकिस्तानला पराभूत केले. पहलगाम मध्ये पाकिस्तानच्या धर्मांध दहशतवादी हल्लयात निष्पाप भारतीयांची केलेल्या हत्येचा बदला भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातून घेऊन पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला आहे. सूडाच्या भावनेपेक्षा मुत्सद्देगिरी आणि नियोजनबद्ध रणनीतीने ‘झिरो टॉलरन्सच्या धोरणावर हे ऑपरेशन चालवत भारताने यशस्वी प्रत्युत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेला दिलेले ‘ऑपरेशन सिंदूर’ हे नाव अत्यंत समर्पक असल्याचे सांगत, राष्ट्र रक्षणाच्या या व्यापक लढाईत प्रत्येक नागरिकाने सजग, सक्षम आणि राष्ट्रनिष्ठ राहून आपली भूमिका बजावली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन झाले. विचार भारतीचे मनोज झंवर यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. नीता गांधी, सुनील नागोरी, विशारद पेटकर, नगरसेवक रवींद्र बारस्कर आदींनी उपस्थितीत पाहुण्यांचा सत्कार केला. डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर अशोकराव गायकवाड यांनी आभार मानून सर्वांच्या उत्स्फूर्त प्रतिसादा बद्दल ऋण व्यक्त केले. विचार भारतीच्या सर्व सदस्यांनी ही व्याख्यानमाला यशस्वी होण्यासाठी मोठे परिश्रम घेतले.

#### दीड तास श्रोत्यांना खिळवून ठेवणारे व्याख्यान

माऊली सभागृहात सुमारे दीड तास मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांनी राष्ट्ररक्षण, सावरकरांचे विचार आणि आधुनिक युद्धनीती यांचा अत्यंत प्रभावी परामर्श घेतला. त्यांच्या अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध आणि ओजस्वी मांडणीने उपस्थित शेकडो श्रोते प्रभावी होत भारावून गेले. व्याख्यानाच्या समारोपानंतर सभागृह ‘भारतमाता की जय’च्या घोषणांनी दुमदुमून गेले आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उभे राहून त्यांना मानवंदना दिली.



मोतीलालजी फिरोदिया बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीचा प्रारंभ करताना पल्लवी विजयवंशी.

# मोतीलालजी फिरोदिया बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीस प्रारंभ

### मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते शुभारंभ; निश्चय आणि एकाग्रतेतूनच घडतात ग्रँडमास्टर

नगर – मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुले बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी पाचव्या फेरीचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्यासह रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव याच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ करण्यात आला. यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, राष्ट्रवादीचे भिंगार शहर अध्यक्ष संजय सपकाळ, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, देवेंद्र ढोकळे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना पल्लवी विजयवंशी म्हणाल्या की, बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून बुद्धीला चालना देणारा आणि व्यक्तिमत्त्व घडवणारा खेळ आहे. या खेळामुळे निर्णयक्षमता, संयम, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो. जीवनात पुढे जाण्यासाठी जिद्द आणि योग्य नियोजन जितके महत्त्वाचे आहे, तितकेच बुद्धिबळात प्रत्येक चाल महत्त्वाची असते. त्या पुढे म्हणाल्या, या खेळामध्ये त्याची हार होते जो हार मानतो आणि विजय त्याचाच होतो जो विजयाचा निश्चय करतो. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि जिंकण्याची जिद्द ठेवून खेळावे. पराभवातून शिकण्याची तयारी ठेवली तर यश नक्की मिळते.

खेळाडूंना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, आजच्या तरुण पिढीमध्ये बुद्धिबळाविषयी वाढणारी आवड ही अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमधून भविष्यात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तसेच ग्रँडमास्टर घडतील, असा विश्वास आहे.

स्पर्धेमध्ये देशभरातून आलेल्या खेळाडूंमध्ये चुरशीचे सामने रंगत असून प्रत्येक पटावर विजयासाठी रणनीती आखली जात आहे.

सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले. खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी आभार मानले.

# कल्याण बायपास रोड परिसरात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

नगर –कल्याण बायपास रस्ता परिसरातील मारुती मंदिर शेजारी राहणाऱ्या एका ११ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा घरात घुसून विनयभंग केल्याची घटना २८ मे रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपी मिनीनाथ चव्हाण याच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पीडित मुलगी घरात एकटीच असताना आरोपी मिनीनाथ चव्हाण याने घरात प्रवेश केला. आरोपीने पीडितेशी अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केला.हा प्रकार घडल्यानंतर पीडितेच्या मजुरी करणाऱ्या पालकांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी मिनीनाथ चव्हाण याच्याविरुद्ध विनयभंग आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये ३१ मे रोजी श्री शंभुकलश काव्यकरंडक स्पर्धा व दुसऱ्या राज्यस्तरीय कवी संमेलन

नगर – श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेचे श्री शंभुकलश काव्यकरंडक स्पर्धा व दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन २०२६ अहिल्यानगर येथे ३१ मे २०२६ रोजी पार पडणार असून, या संमेलनासाठी उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनंत कराड, संमेलनाध्यक्ष नितीन चंदनशिवे (दंगलकार), स्वागताध्यक्ष सुनिल शिंदे, तसेच प्रमुख पाहुणे, ज्येष्ठ साहित्यिक सुनील गोसावी, चित्रपट दिग्दर्शक, गितकार अनिलकुमार होळकर, साहित्यिक डॉ. कैलास दौंड, प्रा.सुरेश वाळेकर लाभले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष कवी महादेव लांडगे, उपाध्यक्ष कवी बाळासाहेब घोरपडे, संस्थेचे संघटक कवी विश्वेश्वर बोडखे, प्रसिद्धी प्रमुख अक्षय विधाते या सर्वांच्या उपस्थितीत संस्थेचे दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन पार पडणार असून संमेलनाचे ठिकाण माऊली सांस्कृतिक भवन टिळक रोड हॉटेल नंदनवन जवळ, अहिल्यानगर येथे असून श्रीशंभुकलशांचा साहित्याचा वारसा जपताना मायमराठीच्या सेवेसाठी सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी या राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन केले आहे असे कार्याध्यक्ष अनिकेत अवसरमल तसेच युवा कवी व संस्थेचे संस्थापक सचिव संदिप पाचारणे यांनी सांगितले आहे

या संमेलनात राज्यभरातून विविध जिल्ह्यातून येणारे कवी गोकुळ गायकवाड अहिल्यानगर, कवी रुपचंद शिदोरे अहिल्यानगर, कवी महेश विलास धामणे अहिल्यानगर, कवी संदेश कोठारकर डोंबिवली ठाणे, कवी किशोर पांचाळ पुणे, कवी दत्तात्रय अनुसया शेषराव ठुबे छत्रपती संभाजीनगर, कवी संजय लक्ष्मण जाधव बारामती, कवी विलास सोनवणे बीड, कवी पवन विस्पुते मनमाड नाशिक, कवी साजन पिलाणे पुणे, कवी समिंदर आदिनाथ भोरे, कवयित्री सारिका भास्कर नळकांडे पुणे, कवी भोलानाथ हरिभाऊ देवकर अहिल्यानगर, कवी विठ्ठल पवार पाथर्डी अहिल्यानगर, कवी बाळासाहेब देशमुख अहिल्यानगर, कवयित्री सुजाता खामकर श्रीगोंदा अहिल्यानगर, कवी दत्तात्रय वारकड अहिल्यानगर, कवयित्री शुभांगी अजय महाजन, अहिल्यानगर, कवी मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल, छत्रपती संभाजीनगर, कवी संतोष स्वामी कपाळे लोणार सरोवर, कवी भराटे सर बीड, कवी मधुसूदन पेटकर सोलापूर, कवी नामदेव हुले पुणे, कवी मकरंद राजेश्वरराव पाटील टाकळी जहागीर, कवी अभिमन्यू फकिरा शिरसाठ सोलापूर, कवयित्री उज्वला राजेंद्र यादव हडपसर पुणे, कवीदिलीप कापसे किल्लेधारुर बीड, कवी सचिन चव्हाण पाथर्डी अहिल्यानगर, कवी अनिल केसेकर चाळीसगाव, कवी विनय पिंपरकर अहिल्यानगर, कवयित्री मोहिनी लोळगे अहिल्यानगर, कवी गोविंद पाठक परळी बीड, खास हैदराबाद, तेलंगणा येथून कवयित्री अनुराधा मारचट्टीवार स्पर्धा व संमेलनासाठी उपस्थित रहाणार आहेत तसेच राज्यभरातून येणाऱ्या नामवंत कवींचा या संमेलनात समावेश असणार आहे असे खास दुबई वरुन आलेले शंभुकलश काव्यसंस्थेचे कोषाध्यक्ष शंकर शिंदे व संस्थेचे अध्यक्ष महादेव लांडगे यांनी सांगितले आहे.

# एमआयडीसीतील २ कंपन्यांमधून चोऱ्या करणाऱ्या दोघांना पकडले

### एकाकडून ८ लाख ३९ हजार तर दुसऱ्याकडून ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – नागापूर एमआयडीसी येथील २ कंपन्यांमधुन चोऱ्या करणाऱ्या दोघा आरोपींना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अभिषेक प्रभाकर शिंदे (वय २६, रा. निंबळक, ता. नगर) व छोटन मियाँ मुल्लु मियाँ (वय २६, रा. तेज इंडस्ट्रीज, नागापूर एमआयडीसी, मूळ रा. बिहार) अशी दोघांची नावे आहेत. हे दोन्हीही आरोपी कंपन्यांमध्ये काम करणारे कामगार आहेत.



नागापूर एमआयडीसी येथील प्रथमेश इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड कंपनीच्या स्टोअर रूममधील लोखंडी रॅकमधून ८ लाख ३९ हजार ६१९ रुपये किमतीचे इलेक्ट्रिक स्विचसाठी चांदीच्या धातूचे वापरण्यात येणारे चांदीच्या धातूचे पार्ट अज्ञात चोरट्याने २१ मे रोजी सायंकाळी ते २२ मे रोजी दुपारी २ वाजेच्या दरम्यान चोरून नेले होते. याबाबत कंपनीचे स्टोअर मॅनेजर प्रदीप प्रभाकर गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यावर स.पो.नि. माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान हा गुन्हा कंपनीतच काम करणाऱ्या अभिषेक शिंदे याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरी केलेला मुद्देमाल आपल्या घरून काढून दिला.

दुसरी चोरी संदीप रामभाऊ ठोकळ (रा. तपोवन रोड) यांच्या मालकीच्या नागापूर एमआयडीसी येथील इंटरप्राईजेस कंपनीत २० मे रोजी रात्री १० वाजल्यापासून ते २१ मे रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या दरम्यान झाली होती. अज्ञात चोरट्याने कंपनीचे पत्रे उचकटून ७० हजार ९१८ रुपये किमतीची ३०.५ किलो वजनाची निकेल प्लेट चोरून नेली होती. या गुन्ह्याचा तपासा दरम्यान स.पो.नि.माणिक चौधरी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पोलिसांनी शेजारील कंपनीत काम करणारा छोटन मियाँ मुल्लु मियाँ याला ताब्यात घेतले. पोलीस चौकशीदरम्यान त्याने सदर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून चोरीतील ४०हजार १२० रुपये किमतीची १७ किलो वजनाची निकेल प्लेट जप्त करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार राजू आप्पासाहेब सुद्रिक करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. माणिक चौधरी, स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. राजू सुद्रिक, सचिन आडबल, पो.कॉ. दिपक फुंदे, नवनाथ दहिसळे, किशोर जाधव आणि राहुल गुंड यांच्या पथकाने केली आहे.

# ‘नो पार्किंग’मधील वाहनावर कारवाई केल्याच्या रागातून महिला कर्मचाऱ्यास मारहाण; गुन्हा दाखल

नगर – महापालिकेने नो पार्किंग मधील वाहनांवर कारवाई साठी नेमलेल्या खाजगी संस्थेच्या एका महिला कर्मचाऱ्याला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना छत्रपती संभाजीनगर रोड वरील भरोसा सेल कार्यालयाच्या मोकळ्या जागेत २९ मे रोजी सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनपाने नेमलेल्या खाजगी संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी नो पार्किंग मधील १ दुचाकी उचलून आणून भरोसा सेल कार्यालयाच्या परिसरात मोकळ्या जागेत लावली होती. तेथे संस्थेच्या महिला कर्मचारी दिपाली अर्जुन चव्हाण या आपली ड्युटी करत होत्या. त्या वेळी आरोपी इरफान लाला शेख, त्यांची पत्नी आणि मुलगी (तिघे रा. नवेद कॉम्प्लेक्स, मुकुंदनगर) हे तिघे जण तेथे आले. त्यांनी आपली दुचाकी वाहनाची पावती न फाडता ती घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. कर्तव्य बजावत असलेल्या महिला कर्मचाऱ्याने त्यांना थांबवून रीतसर पावती फाडून वाहन घेऊन जाण्यास सांगितले. या साध्या गोष्टीचा राग आल्याने आरोपी इरफान शेख याने महिला कर्मचाऱ्याचा हात धरून त्यांना जोराने धक्का दिला आणि जमिनीवर पाडले. त्यानंतर त्याच्या मुलीने महिला कर्मचाऱ्याच्या तोंडावर हाताने मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, महिला कर्मचाऱ्याच्या हातातील शासकीय पावती फाडण्याचे यंत्र हिसकावून घेऊन ते जमिनीवर फेकून फोडले आणि सरकारी मालमत्तेचे नुकसान केले.

त्यानंतर मुलीने आपल्या हातातील दुचाकीच्या चावीने महिला कर्मचाऱ्याच्या ओठावर मारून त्यांना जखमी केले. आरोपीच्या पत्नीने देखील महिला कर्मचाऱ्याला आणि तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत जखमी झालेल्या महिला कर्मचाऱ्याला उपचारासाठी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी पीडित महिला कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून आरोपी इरफान लाला शेख, त्याची पत्नी आणि मुलगी यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणने, मारहाण करणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे या कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गोंटला हे करत आहेत.

# ‘नीट – युजी’ परीक्षा घोटाळ्याविरोधात नगरमध्ये ‘सम्यक विद्यार्थी’नी दिले धरणे

नगर – देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात टाकणाऱ्या NEET-UG 2026 परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाविरोधात वंचित बहुजन आघाडी प्रणीत सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय मार्गाने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलन संपल्यानंतर कार्यकर्त्यांनी उपचिटनीस तथा नायब तहसीलदार मयुर बेरड (गृह शाखा) यांना आपल्या मागण्यांचे अधिकृत निवेदन सुपूर्द केले. हे आंदोलन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या प्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अजित कुऱ्हाडे, उप महासचिव पंकज गायकवाड, तसेच अविनाश ठोंबरे, प्रसाद कांबळे, आणि संकेत शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

NEET-UG 2026 पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री घ धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा. तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलन अहिल्यानगरच्या वतीने परीक्षा घेण्याची जबाबदारी National Testing Agency कडून काढून घेऊन ती UPSC कडे सोपवण्यात यावी. विद्यार्थ्यांसाठी NEET ची फेरपरीक्षा पूर्णपणे विनामूल्य आणि तत्काळ घेण्यात यावी. व्यावसायिक कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने स्वतंत्र व कडक कायदा लागू करावा अशा मागणी करण्यात आली. शिक्षणाचा हा वाढता बाजार आणि भ्रष्टाचार थांबवला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा या वेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने देण्यात आला.

# मनपाच्या ६९ सेवा ऑनलाईन; घरबसल्या मिळणार विविध दाखले व प्रमाणपत्रे

### झेंडिगेट येथे विशेष आरटीएस मार्गदर्शन कक्षाचा प्रारंभ

नगर – महाराष्ट्र शासनाच्या नागरिकांना ऑनलाईन (आरटीएस) सेवा उपलब्ध करून देण्याच्या धोरणाअंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये एकूण ६९ विविध सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना घरबसल्या विविध दाखले व प्रमाणपत्रे काढता येणार आहे. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि तत्पर सेवा मिळणार आहे. या सेवांबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने झेंडिगेट येथे स्वतंत्र आरटीएस मार्गदर्शन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.



या मार्गदर्शन कक्षाचे उद्घाटन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, अशोक साबळे, सिस्टिम मॅनेजर अंबादास साळी, प्रभाग अधिकारी शाम गोडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी संगणक विभागातील शेखर बनकर, अनिरुद्ध गायके, अमित म्याना तसेच प्रभाग समितीतील शाम शिंदे, भालेराव, वाडेकर, अर्जुन जाधव यांनी नागरिकांना थेट मोबाईलद्वारे अर्ज भरून देण्यास मदत केली. नागरिकांना आरटीएस सेवांचा वापर कसा करावा, अर्ज प्रक्रिया कशी करावी आणि ऑनलाइन प्रणालीद्वारे कोणत्या सुविधा मिळू शकतात याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले.

महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून आपले सरकार व नगर कार्यावली अंतर्गत नागरिकांना घरबसल्या सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत आरटीएस प्रणालीद्वारे नागरिकांना जलद सेवा देणे हा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

महानगरपालिकेमार्फत नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या ६९ ऑनलाईन सेवांमुळे विविध शासकीय कामकाजासाठी कार्यालयात वारंवार चकरा मारण्याची गरज कमी होणार असून पारदर्शक व गतिमान प्रशासन अधिक मजबूत होणार आहे. नागरिकांनी या ऑनलाईन सेवांचा लाभा घ्यावा, असे आवाहन यावेळी मनपा प्रशासनाकडून करण्यात आले.





प्रदर्शित झालेला मराठी चित्रपट देऊळ बंद २ ब्लॉकबस्टर झाल्याबद्दल निर्देशक कलाकार प्रवीण तरडे आणि स्वप्निल मुनोत आणि संपूर्ण देऊळ बंद २ च्या कलाकारांनी अहिल्यानगर मधील कॉम्प्लेक्स सिनेमा कोहिनूर मॉल सावेडी येथे भेट दिली. यावेळी संचालक प्रणील मुनोत आणि कोहिनूर मॉलचे संचालक अश्विन गांधी आणि व्यवस्थापक जावेद शेख, सुचित मुथा, पियुष पाटील, श्री. मंदार केले, संदीप गजभिऊ आणि संपूर्ण कॉम्प्लेक्स टीमतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.





प्रदर्शित झालेला मराठी चित्रपट देऊळ बंद २ ब्लॉकबस्टर झाल्याबद्दल निर्देशक कलाकार प्रवीण तरडे आणि स्वप्निल मुनोत आणि संपूर्ण देऊळ बंद २ च्या कलाकारांनी आशा स्क्वेअरला भेट दिली. याप्रसंगी संचालक तेजस करंदीकर तसेच कोतवालीचे संभाजी गायकवाड, व्यवस्थापक नितीन वाळुंजकर, प्रविण वानखेडे, गौतम पगारे, संदीप वानखेडे, आणि संपूर्ण आशा स्क्वेअर टीम यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

